दैनिक

# समर्थ राजयोग

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

SAMARTH RAJYOG

वैभव विवेक स्वामी
सपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष - ६ वे अंक -१७६ रविवार दि.०१ मार्च २०२६ 98 22 62 85 21 आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रु । पाने ४


Beed Daily Marathi Year-6th Issue-176 Sunday, Dt.01 March 2026 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

## बीड नगर पालिकेच्या पहिल्या बजेटमधून विकासाचा संकल्प

# ना कोणती करवाढ, ना कसली दरवाढ

बीड (प्रतिनिधी) - बीड नगर परिषदेचा सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठीचा अर्थसंकल्प सादर केला आहे. २७५ कोटी ४ लाख ५० हजार रूपयांच्या उत्पन्नाचे उध्दीष्ट ठेवण्यात आले आहे. कोणतीही कर वाढ आणि दर वाढ न करता बीड शहरातील नागरीकांना दिलासा देणारा, शहराच्या सर्वांगिण विकासाचा अंदाजपत्रकीय अर्थसंकल्प सादर करण्यात आला आहे. सर्व समावेशक अंदाजपत्रकाच्या माध्यमातून बीड नगर परिषदेने विकासाकडे वाटचाल सुरू केली असुन आ.विजयसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील विकास कामांना गती मिळेल अशी माहिती नगराध्यक्षा प्रेमलताताई पारवे यांनी दिली आहे.

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री स्व.अजितदादा पवार यांच्या नेतृत्वात आ.विजयसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली बीड नगर परिषद निवडणूकीत यश मिळाल्यानंतर पहिल्यांदाच अर्थसंकल्पीय विशेष सभा पार पडली आहे. शिव-शाहु-फुले-आंबेडकर मौलाना आझाद विकास आघाडीच्या माध्यमातून बीड शहराच्या विकासाचा ध्यास घेण्यात आलेला आहे. शुक्रवार दि.२७ फेब्रुवारी रोजी बीड नगर परिषदेच्या गोपीनाथरावजी मुंडे सभागृहामध्ये झालेल्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकाच्या मान्यतेच्या विशेष सभेत नगराध्यक्षा प्रेमलताताई पारवे यांनी सन २०२६-२७ या वर्षासाठीचा अंदाजपत्रक आराखडा सभागृहासमोर मांडला. यात कोणतीही कर वाढ आणि दर वाढ न करता बीड शहरातील पायाभुत सुविधा आणि सर्व समावेशक विकास



### नगराध्यक्षांनी सर्व नगरसेवकांना दिली चर्चेची संधी

दि.२७ फेब्रुवारी रोजी बीड नगर परिषदेची विशेष अर्थसंकल्पीय सभा झाल्यानंतर दुपारी २ वाजता सर्व साधारण सभा सुरू झाली. स्वच्छता, पाणी पुरवठा, नियोजन, बांधकाम यासह सर्व विभागांकडून मोठ्या प्रमाणात विषय असल्याने सभागृहातील सर्व सदस्यांना चर्चेसाठी नगराध्यक्षा प्रेमलताताई पारवे यांनी संधी दिली. यातील अनेक सदस्यांना आपल्या भागातील प्रश्न मांडत असतांना वेळ पुरला नसल्याने पुन्हा आज सकाळी ११ वाजल्यापासून काल खंडीत केलेली सर्व साधारण सभा पुन्हा सुरू करण्यात आली होती. या सर्व साधारण सभेमध्ये शहरातील विविध भागातील नगरसेवक आपले प्रश्न मांडत असुन त्यावर मार्ग काढण्याच्या सुचना नगराध्यक्षा प्रेमलताताई पारवे यांच्याकडून पालिका प्रशासनाला देण्यात येत आहेत.

**बीडकरांना दिलासा : आ. विजयसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली विकास कामांना गती देणार - नगराध्यक्षा प्रेमलताताई पारवे**



## अनंत इंगळे यांना राज्यस्तरीय ‘समाजरत्न’ पुरस्कार प्रदान

परळी ।प्रतिनिधी

राष्ट्रसंत गाडगेबाबा बहुउद्देशीय सेवाभावी संस्था यांच्या वतीने देण्यात येणारा प्रतिष्ठेचा राज्यस्तरीय ‘समाजरत्न’ पुरस्कार नगरसेवक अनंत इंगळे यांना प्रदान करण्यात आला. संत गाडगेबाबा यांच्या जयंतीनिमित्त स्व. लोकनेते गोपीनाथराव मुंडे नटराज रंगमंदिर, परळी येथे आयोजित भव्य कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते त्यांना समर्थचिन्ह, प्रमाणपत्र, शाल व श्रीफळ देऊन गौरविण्यात आले.प्राचार्य डॉ. श्रीपाल सबनीस, सहाय्यक आयुक्त मा. विशालजी लोंढे,ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज वाबळे हस्ते प्रधान व

# अंबडमध्ये वकिलावर जीवघेणा हल्ला वकील सरक्षण कायद्यासाठी वकील संघ आक्रमक

### मुख्यमंत्र्यांना तहसीलदारांमार्फत निवेदन आरोपीला तात्काळ अटकेची मागणी

अंबड ।प्रतिनिधी

न्यायालयीन कामकाजात न्यायालयीन अधिकारी म्हणून महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या वकिलांवर सातत्याने होणारे हल्ले आणि धमक्यांच्या सत्राने आता टोक गाठले आहे.अंबड येथील अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालयातील विधीतज्ञ ड. लक्ष्मण गायके यांच्यावर एका सराईत गुन्हेगाराने केलेल्या अमानुष हल्ल्याच्या निषेधार्थ अंबड वकील संघाने आक्रमक पवित्रा घेतला आहे. वकिलांच्या सुरक्षेचा प्रश्न



ऐरणीवर असून आता केवळ आश्वासने नको, तर वकील संरक्षण कायदा तात्काळ लागू करा अशी मागणी मुख्यमंत्री महोदय यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

दि.२२ फेब्रुवारी २०२६ रोजी मौजे लोणार भायगांव ता. अंबड येथे ड.लक्ष्मण गायके यांच्यावर अश्फाक आसिफ शेख रा.बालेपीर बीड या सराईत गुन्हेगाराने हल्ला केला. आरोपीने आरेरावीची भाषा वापरत अर्वाच्य शिवीगाळ केली आणि मारहाण करत जिवे मारण्याची धमकी दिली. इतकेच नव्हे तर ड.गायके यांच्या गळ्यातील सोन्याची चैन हिसकावून आरोपी फरार झाला. याप्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा क्र. १०५/२०२६ दाखल होऊनही आरोपी अद्याप मोकाट असल्याने वकिलांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

राज्यात वकिलांच्या सुरक्षेचा रामभरोसे कारभार

निवेदनात नमूद केल्यानुसार केवळ

# अजित दादा कर्ते सुधारक होते कल्याण आखाडे यांचे प्रतिपादन




### अजित स्मृती व्याख्यानमालेला सुरुवात

बीड(प्रतिनिधी)महाराष्ट्राच्या राजकारणात अजित दादा पवार यांच्या सारखा नेता दुसरा होणार नाही.प्रत्येक बाबतीत त्यांचे वेगळेपण होते. राजकिय नेते बोलतात जास्त आणि कृती कमी करतात.अजित दादा हे पुर्णपणे कर्ते सुधारक होते. आपल्या राजकिय जीवनातला प्रत्येक क्षण त्यांनी कृती करण्यामध्येच घालवला. भाजपा प्रणित आघाडी सोबत जाण्याचा निर्णय घेतल्यानंतर अजित दादा गेल्या तीन वर्षापासून स्वयंभू नेते झाले होते.त्यांनी स्वत:ला पुर्णपणे सिध्द केले होते. आता भविष्यात एकहाती राज्य मिळवण्यासाठी त्यांचे नेतृत्व तयार असतानाच त्यांची अकाली एक्झीट झाली अशी खंत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे स्टार प्रचारक कल्याण आखाडे यांनी व्यक्त केली.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईच्या बीड जिल्हा शाखेच्या वतीने अजित स्मृती व्याख्यानमाला सुरु करण्यात

## स्थानिक गुन्हे शाखेने चांदणेवस्ती पेठ बीड येथील पत्र्याच्या शेडवर छापा टाकुन ३,५९,३८८ रूपयाचा गुटखा केला जप्त

बीड ।प्रतिनिधी

पोलीस अधीक्षक, बीड यांनी जिल्ह्यातील अवैध धंद्याचे समुळ उच्चटन करणे बाबतचे आदेश दिलेले आहेत. पोलीस निरीक्षक स्था.गु.शा., बीड यांना गुप्त बातमीदारा मार्फत माहिती मिळाली की, चांदणेवस्ती पेठ बीड येथील एका पत्र्याच्या शेडमध्ये फेरोज दस्तगीर तांबोळी रा. चांदणे वस्ती बीड याने बेकायदेशिररित्या विविध कंपनीचा गुटखा विक्री करण्यासाठी साठवुन ठेवलेला आहे.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, यांच्या



आदेशाने पोउपनि श्रीराम खटावकर, पोह/ राहुल शिंदे, पोह/युनुस बागवान, पोह/गोविंद राख, मपोह/ स्वाती मुंडे, पोअ/अशपाक सय्यद, पोअ/मनोज परजणे, चालक पोह/ नितीन वडमारे सर्व नेमणुक स्थागुशा बीड असेनी मिळुन मिळालेल्या माहितीच्या ठिकाणी जाऊन दि.२८.०२.२०२६ रोजी ०८.४५ वाजता छापा मारला असता सदर ठिकाणी असलेला फेरोज दस्तगीर

# डोळ्यात चटणी टाकुन सोनारास लुटणारी दरोडेखोरांची टोळी जेरबंद

### स्थानिक गुन्हे शाखा दमदार कामगिरी

बीड ।प्रतिनिधी

दिनांक २१.०२.२०२६ रोजी यातील फिर्यादी हा सोनार असुन तो सोने विक्री करण्यासाठी जुन्या डिघोळअंबा रोडने मोटार सायकलवर बसुन जात असताना होळ ते डिघोळअंबा येथील दर्गाजवळ अज्ञात दोन मोटार सायकलवर चार जनांनी येवून सोनाराची मोटार सायकल आडवुन त्याचे डोळ्यात तिखट चटणी टाकुन व त्यास चाकुचा धाक दाखवुन मारहाण करुन हातातील सोन्याची पिशवी जबरदस्तीने हिसकावून घेवून पळून गेले होते. वगैरे फिर्यादीवरुन पोलीस ठाणे युसुफ वडगांव येथे गु.र.नं ४६/२०२६ कलम ३०९ (६) बी.एन.एस प्रमाणे दिनांक २१.०२.२०२६ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला होता. अज्ञात आरोपीचा शोध पोलीस ठाणे व स्थानिक गुन्हे शाखेचे पथक घेत होते परंतु आरोपीचा ठावठिकाणा लागत नव्हता.

वर नमुद गुन्हयाचा तपास स्थानिक गुन्हे शाखा करत असताना एकुण जवळपास ५० पेक्षा जास्त सिसिटिव्ही फुटेज तपासण्यात आले होते. सिसिटिव्ही फुटेज मधील संशयीत ईसमांची माहीती घेणे सुरु असताना दिनांक २६..०२.२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गुप्त बातमीदारामार्फत माहीती मिळाली की, सदर सिसिटिव्ही फुटेज मधील संशयीत ईसम नामे रोहीत रंजीत थिमधिमे हा असुन तो अंबाजोगाई बसस्थानक लगत राज मेडीकल जवळ उभा असल्याची माहीती मिळाल्यावरुन त्यास पथकाने ताब्यात घेवुन विचारपुस केली असता त्याने सदरचा गुन्हा हा सुदाम गणपत सोनवणे, रा डिघोळ अंबा ता.धारुर व पोलीस अभिलेखावरील गुन्हेगार वीरसिंग रिसपालसिंग टाक, रा. अंबाजोगाई, पांचे सांगणेवरुन त्याचे ईतर साथीदार नामे १. अभिषेक अशोक घाटुळ रा कन्हेवाडी ता. परळी, २ कानिफनाथ विलास डुरकर, रा क्रांती नगर अंबाजोगाई, ३. यशोदिप कल्याण किर्दन, रा सातेफळ, ता. अंबाजोगाई याचेसह मिळुन केला असल्याचे सांगीतले.

सदर गुन्हयात एकूण सहा आरोपी जेरबंद करण्यात स्थानिक गुन्हे शाखेला यश आले आहे. तसेच आरोपीतांकडून गुन्हयात वापरलेल्या दोन मोटार सायकली कि अं १,५०,०००/- रु. सहा मोबाईल कि. अं ९०,०००/- रु.चे व जबरदस्तीने चोरुन नेलेले सोन्याचे दागीणे कि.अं

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
Bureau of Indian Standards
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ
सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777
6 x 6.5

संपादकीय....

# सुनियोजित कट !

राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेच्या (एनसीईआरटी) इयत्ता आठवीच्या पाठ्यपुस्तकावर सुप्रीम कोर्टाने सरसकट बंदी घातली असून हे कृत्य म्हणजे सुनियोजित कट असल्याचे सांगत केंद्र सरकारला गुरुवारी चांगलेच फटकारले. तसेच केंद्र आणि राज्य सरकारला पुस्तकाच्या सर्व प्रती परत घेण्याचे आणि डिजिटल प्लॅटफॉर्मवरूनही प्रती काढून टाकत दोन आठवड्यांत अहवाल सादर करण्याचे निर्देश न्यायालयाने दिले. सरन्यायाधीश सूर्य कांत, न्या. बागची आणि न्या. पांचोली यांच्या खंडपीठाने सरकारची गुरुवारी चांगलीच खरडपट्टी काढली. शिक्षणाची अखंडता राखण्यासाठी या प्रकरणामध्ये तातडीने हस्तक्षेप आवश्यक आहे, असे खंडपीठाने म्हटले आहे. ज्या वयामध्ये विद्यार्थ्यांना सार्वजनिक जीवन आणि संस्थात्मक संरचनांचे बारकावे समजू शकतात त्या वयामध्ये एकतर्फी वक्तव्ये समोर आल्यास मूलभूत गैरसमज निर्माण होतात आणि त्यामुळे न्यायपालिकेची जबाबदारी समजण्यापासून रोखले जाते, असे सरन्यायाधीश म्हणाले आणि त्यांनी हे प्रकरण बंद करणार नसल्याचे संकेतही दिले.

'त्यांनी गोळी झाडली असून न्यायव्यवस्था रक्तबंबाळ झाली आहे, चुकीला माफी नाही, दोषींची नावे सांगा, आम्ही कारवाई करतो', असेही यावेळी सुप्रीम कोर्टाने सरकारला बजावले. आता या प्रकरणाची पुढील सुनावणी ११ मार्च रोजी होणार आहे. या प्रकरणी बिनशर्त माफी मागण्यात आली असली तरी ती स्वीकारता येणार नाही. हे पुस्तक कसे प्रकाशित झाले याची चौकशी केली जाईल, आम्ही या संस्थेला कलंकित होऊ देऊ शकत नाही, हे एक षडयंत्र असू शकते. संपूर्ण न्यायव्यवस्थेला अशा प्रकारे लक्ष्य करणे चुकीचे आहे, असेही सरन्यायाधीश म्हणाले. 'एनसीईआरटी'ने हे वादग्रस्त प्रकरण काढून टाकले असले तरी या पुस्तकाच्या ३८ प्रती त्यांच्यासाठी डोकेदुखी ठरत आहेत. विकल्या गेलेल्या ३८ प्रती परत मिळवण्याचा शिक्षण मंत्रालयाकडून प्रयत्न केला जात आहे. 'विचार न करता उचललेले पाऊल' असे संबोधून सरन्यायाधीश म्हणाले की, एनसीईआरटीच्या प्रसिद्धिपत्रकामध्ये माफीचा एकही शब्द नाही. हा एक रचलेला सुनियोजित कट आहे.

हे पुस्तक बाजारात उपलब्ध आहे आणि माझ्याकडे त्याची एक प्रत आहे. प्रथमदर्शनी, पुस्तकातील मजकुराची तपासणी केल्यावर आम्हाला असे दिसते की, हे संस्थेला कमकुवत करण्यासाठी आणि न्यायव्यवस्थेची प्रतिष्ठा कमी करण्यासाठी जाणूनबुजून केलेले डावपेच आहेत, असे सरन्यायाधीश म्हणाले. न्यायपालिकेला एक संस्था म्हणून बदनाम करण्याचा प्रयत्न केला जात आहे. जनतेच्या आणि लहान मुलांच्या मनात न्यायपालिकेची नकारात्मक प्रतिमा निर्माण करण्याचा प्रयत्न केला गेला आहे. माजी सरन्यायाधीशांनी बोललेले काही शब्द जाणूनबुजून निवडले गेले होते. त्यातून असे चित्रित करण्याचा प्रयत्न करण्यात आला की, न्यायपालिकेविरुद्ध अनेक भ्रष्टाचाराचे खटले दाखल केले जातात, जे कधीही ऐकले जात नाहीत. हे बदनाम करण्याचे षडयंत्र आहे. लेख प्रकाशित करणाऱ्या वृत्तपत्राने एनसीईआरटीला प्रश्न विचारला तेव्हा, मजकूर प्रेरित आणि सदोष असल्याचे मान्य करण्याऐवजी, संचालकांनी मजकुराचा बचाव केला. मजकुरात भ्रष्टाचार निर्मूलनासाठी न्यायपालिकेच्या प्रयत्नांची चर्चा करण्यात आली नाही.

# समृद्धी महामार्गावर धाडसी कारवाई

## संरक्षण जाळी-लोखंडी अँगल चोरणारी टोळी चंदनझिरा पोलिसांच्या तावडीत ५ लाख ५३ हजारांचा मुद्देमाल जप्त

जालना ।प्रतिनिधी

समृद्धी महामार्गावर जनावरांचा प्रवेश रोखण्यासाठी उभारण्यात आलेल्या संरक्षण जाळ्या व लोखंडी अँगल चोरी करून शासनाच्या सुरक्षेलाच तडा देणाऱ्या टोळीवर चंदनझिरा पोलिसांनी मध्यरात्री धडक कारवाई करत मोठा घाव घातला आहे.या कारवाईत तब्बल ५ लाख ५३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून तीन आरोपींना अटक करण्यात आली आहे.

दि.२८ फेब्रुवारी २०२६ रोजी मध्यरात्री १२.३० वाजताच्या सुमारास चंदनझिरा पोलीस ठाण्याचे पथक समृद्धी महामार्गालगत गस्त घालत असताना जालना शहराकडे येणारे एक पिकअप वाहन संशयास्पदरीत्या वेगाने जात असल्याचे निदर्शनास आले. पोलिसांनी तत्काळ पाठलाग सुरू केला.पोलिसांचा ससेमिरा सुरू असल्याचे लक्षात येताच वाहनातील तिघांनी अंधाराचा फायदा घेत पळ काढण्याचा प्रयत्न केला.मात्र पोलिसांच्या



चपळाईपुढे त्यांचा डाव फसला आणि तिघांनाही शिताफीने ताब्यात घेण्यात आले.

तपासात पिकअप चक-२०,ऋछ-०४१५ मधून सुमारे एक टन वजनाचे लोखंडी अँगल व संरक्षण जाळी तसेच लोखंड कापण्यासाठी वापरण्यात येणारे कटर जप्त करण्यात आले.प्राथमिक चौकशीत आरोपींनी समृद्धी महामार्गालगतून हे साहित्य चोरून जालना शहरात विक्रीसाठी आणल्याची कबुली दिली आहे.

अटक करण्यात आलेल्यांमध्ये राहुल मुंडे,इरफान शेख दोघे रा. सिदखेडराजा जि.बुलढाणा आणि वाहनचालक-मालक देवेंद्र शंकर डोंगरे रा.केळव शिंदगी ता.सिदखेडराजा जि. बुलढाणा यांचा समावेश आहे. तिघांविरुद्ध चंदनझिरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांना न्यायालयात हजर केले असता न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे.समृद्धी महामार्गाच्या सुरक्षेला तडा देणाऱ्या अशा प्रकारच्या चोरींमुळे अपघाताचा धोका वाढण्याची शक्यता असते.त्यामुळे या प्रकरणाकडे अत्यंत गांभीर्याने पाहिले जात असून पुढील तपास सुरू आहे. चोरीच्या मालाची खरेदी करणाऱ्या संबंधितांवरही कठोर कारवाई होणार असल्याचे संकेत पोलिसांनी दिले आहेत.

ही धडक कारवाई वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली चंदनझिरा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बाळासाहेब पवार, पोहेकॉ.कृष्णा तंगे,चालक पो.ना.सुभाष नागरे,पोहेकॉ. शिवानंद जायभाय यांच्या पथकाने केली.

# बदलत्या हवामानाचा घाला बारसवाड्यात मोसंबीचा सडा

## प्रशासनाच्या उदासिनतेवर संताप पंढरीनाथ माळकरींच्या कष्टाची फळे मातीमोल

अंबड ।प्रतिनिधी

निसर्गाचा लहरीपणा आणि प्रशासनाचे दुर्लक्ष यांचा दुहेरी फटका आता अंबड तालुक्यातील शेतकऱ्यांना बसू लागला आहे.बारसवाडा येथील प्रगतशील शेतकरी पंढरीनाथ माळकरी यांची बहरलेली मोसंबीची बाग बदलत्या हवामानामुळे उद्ध्वस्त झाली असून काढणीला आलेली फळे झाडावरून गळून पडत आहेत. वर्षभराचा घाम एका आठवड्यात मातीमोल झाल्याने शेतकरी हवालदिल झाला असून आता तरी सरकारला जाग येईल का ? असा संतप्त सवाल विचारला जात आहे.

गेल्या काही दिवसांपासून वातावरणात सातत्याने बदल होत आहेत.कधी कडक ऊन तर कधी दव



आणि धुक्याचा वेढा, यामुळे मोसंबीच्या झाडांवर विपरीत परिणाम झाला आहे. माळकरी यांनी वर्षभर मशागत, महागडी औषध फवारणी आणि खतांवर लाखो रुपये खर्च केले. मात्र ऐन बाजारात विक्रीला नेण्याच्या वेळीच निसर्गाच्या लहरीपणाचा घाला बसला. बागेत नजर जाईल तिथे फक्त गळलेल्या मोसंबीचा सडा पाहायला मिळत आहे.

शेतकऱ्याचे कंबरडे मोडले!

बाजारपेठेत चांगला भाव मिळेल या आशेने पोटच्या पोरासारखी बाग जपली. पण आज तीच फळे डोळ्यादेखत मातीत मिसळताना पाहून काळीज तीळ-तीळ तुटतंय. हा केवळ फळांचा पडलेला सडा नाही तर माझ्या वर्षभराच्या कष्टाची राखरांगोळी आहे.

पंढरीनाथ माळकरी बाधित शेतकरी

प्रशासनाची धोक्याची घंटा कधी वाजणार ?हवामान बदल ही आता केवळ चर्चेची गोष्ट राहिलेली नसून ती शेतकऱ्याच्या उंबरठ्यावर येऊन ठेपली आहे. बारसवाडा परिसरातील अनेक बागायतदारांची हीच अवस्था आहे. मात्र, कृषी विभाग अद्यापही सुस्त असल्याचे चित्र आहे.ग्रामस्थांच्या प्रमुख मागण्या

कृषी विभागाने तातडीने बागेत जाऊन स्पॉट पंचनामा करावा.

नैसर्गिक आपत्ती अंतर्गत तातडीची आर्थिक मदत जाहीर करावी.नुकसान भरपाईसाठी प्रशासनाने लाल फितीचा कारभार बाजूला ठेवून तत्परता दाखवावी.

आता तरी प्रशासन जागे होणार का ?लाखो रुपयांचे उत्पन्न डोळ्यादेखत पाण्यात गेले असताना प्रशासन कागदी घोडे नाचवण्यात वेळ घालवणार की प्रत्यक्ष बांधावर जाऊन मदतीचा हात देणार? असा सवाल बारसवाड्यातील शेतकरी विचारत आहेत. जर लवकर दखल घेतली नाही तर शेतकरी अधिक आक्रमक पवित्रा घेण्याच्या तयारीत आहेत.



# दावरवाडी न्यू हायस्कूल शाळेत कवीकुसुमाग्रज जयंती साजरी

दावरवाडी ।प्रतिनिधी

ता.२७ (बातमीदार) : येथील न्यू हायस्कूल उच्च माध्यमिक विद्यालयात आज श्रेष्ठ कवी विष्णू वामन शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस मराठी भाषा गौरव दिन म्हणून साजरा करण्यात आला. कवी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेस शालेय समिती अध्यक्ष शाम तांगडे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी भीमराव तांगडे, राजू नंनवरे, मुबिन सय्यद, अन्वर शेख कचरू नाचण, विठ्ठल तळपे, मुख्याध्यापक संजयराजे निंबाळकर, पर्यवेक्षक सुधीर वाघ, कैलास कणके, बाबासाहेब खांडे, संजय बादल, श्रीकांत कंठाली, रामराव खवळे, राजेश मुळे, नारायण भंडारी, सुभाष शेळके, अझहर पठाण, सुरेश ठाकरे, सलीम शेख, हाराळे, पोंधे, उदय मुळे, अमोल पांडव शिवाजी घुंगासे, गोविंद चित्रे आदी उपस्थित होते.

छाया : श्रेष्ठ कवी कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून वंदन करताना अध्यक्ष शाम तांगडे, संजयराजे निंबाळकर, सुधीर वाघ आदी.

छाया : भगवान सोरमारे

# जाफ्राबाद येथे दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी साहित्य मोजमाप पॉकिटमेंट शिबीर उत्साहात संपन्न



जाफराबाद ।हरी भालके

सामाजीक न्याय व अधिकारीता मंत्रालय नवी दिल्ली यांच्या अधिनस्त असलेल्या अलिम्को संस्था जबलपुर यांच्या पथकामार्फत मुंबईव्दारे -ऊखझ योजने अंतर्गत जिल्हा परिषद जालना व समावेशित शिक्षण विभाग पंचायत समिती जाफ्राबाद यांच्या मार्फत तालुकास्तरावर साहित्य साधने पुरविण्याकरीता मोजमाप घेण्यासाठी विद्यार्थ्यांचे मोजमाप शिबीर रोज बुधवारी आयोजीत करण्यात आले होते. या शिबिरामध्ये जाफ्राबाद तालुक्यातील विशेष गरजा असणाऱ्या बौद्धिक अक्षमता (मतिमंद), बहुविकलांग, अस्थिव्यंग, सेरेब्रल पाल्सी, कर्णबधिर व इतर ३ ते १८ वर्ष वयोगटातील ५२ दिव्यांग विद्यार्थी, ५२ पालक, संबंधित शिक्षक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

दिव्यांग विद्यार्थ्यांच्या स्नायु व सांध्या अंतर्गत तिव्र दोष असल्याने, अशा विद्यार्थ्यांना त्यांच्या मापानुसार साहित्य तयार करुन दिल्यास त्यांच्या शरीराची स्थीती टिकवुन ठेवण्यास मदत होते व अध्ययन प्रक्रीयेतील अडथळे दुर होतात.

त्याअनुषंगाने संदर्भित मतिमंद, बहुविकलांग, अस्थिव्यंग, सेरेब्रल पाल्सी, सी.पी.एम.आर, असलेल्या विद्यार्थ्यांना प्रत्यक्षात त्यांच्या मापानुसार सुलभपणे वर्गात बसता येईल, शालेय परिसरात व दैनंदिन परिसरात कार्यकृती करता येईल. अशाच साहित्य साधनांची व उपकरणांची अलिम्कोच्या तज्ञा मार्फत समन्वयांनी मोजमाप करून स्प्लींट, मॉडीफाय चेअर, कॉर्नर सिटींग, कॅलीपर, बैंकसपोर्ट सिटींग, वॉकर, कृत्रीम अवयव, क्रचेस, रोलेटर, एम.आर. कीट, आदी साहित्य साधने निश्चित करण्यात आले.

## पान १ वरुन...

**अनंत इंगळे यांना ....**

अभिनंदन करून पुढील सामाजिक वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या.

अनंत इंगळे यांना मिळालेला हा 'समाजरत्न' पुरस्कार त्यांच्या निस्वार्थ सेवाभावाची पावती असून, भविष्यातही ते समाजहितासाठी अधिक जोमाने कार्य करतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे सचिव पृथ्वी शिंदे , पत्रकार विकास वाघमारे, सुशिल पोटभरे, रोहित झिंजुर्डे, राहुल सूर्यवंशी , विशाल डोंबे , महेश मुंडे, आदी उपस्थित होते.

**बीड नगर पालिकेच्या....**

कामाला प्राधान्य देण्यात आल्याने सभागृहातील सर्व सदस्यांनी या अंदाजपत्रकास सहमती दिली आहे.

बीड शहरातील विकास कामे, आस्थापना खर्च आरोग्य सेवा, दिवाबत्ती आणि पाणी पुरवठा यांसारख्या अत्यावश्यक सेवांवर नगर परिषद २७४ कोटी ९९ लाख रूपये खर्च करणार आहे. या नियोजित खर्चानंतरही ७ लाख ५० हजारांची शिल्लक रक्कम पालिकेकडे असणार आहे. भांडवली जमा रकमेचा मोठा हिस्सा १५७ कोटी ८२ लक्ष हा शहरातील रस्ते, नाली बाधकाम आणि मोठ्या पायाभूत प्रकल्पांसाठी वापरला जाणार आहे. महसुली उत्पन्नातून कर्मचार्यांचे पगार आणि दैनंदिन स्वच्छतेची कामे पुर्ण केली जातील. हा मांडलेला अर्थसंकल्प शहराच्या सर्वांगिण विकासासाठी दिशादर्शक असुन या बजेटच्या माध्यमातून विकासाचा संकल्प केलेला असल्याचे नगराध्यक्षा प्रेमलताताई पारवे यांनी सांगितले आहे.

या अर्थसंकल्पीय सभेला उपनगराध्यक्ष तथा पाणी पुरवठा सभापती विनोद मुळूक, स्वच्छता सभापती शेख निजाम, बाधकाम सभापती संजय उडाण, नियोजन सभापती बाळासाहेब गुंजाळ, महिला व बालकल्याण सभापती आरती रंजित बनसोडे, गटनेते फारूख पटेल, गटनेते खुर्शीद आलम, गटनेत्या सारिका क्षीरसागर व स्थायी समितीचे सर्व सदस्य, मुख्याधिकारी शैलेश फडसे, सर्व नगरसेवक, पालिकेचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

**अजित दादा कर्ते ....**

आली आहे. अजित दादांचे निधन २८ तारखेला झाले. ही तारीख कायम लक्षात राहावी आणि त्या दिवशी दादांचे स्मरण व्हावे, त्यांच्या आठवणींचा जागर व्हावा या उद्देशाने प्रत्येक महिन्याच्या २८ तारखेला बीडमध्ये व्याख्यान होणार आहे. त्याची सुरुवात काल २८ फेब्रुवारी रोजी झाली. पहिले व्याख्यान कल्याण आखाडे याचे झाले. या प्रसंगी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे, बीड जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष संतोष मानूरकर,लोकपत्रकार भागवत तावरे, पत्रकार संघाचे बीड शहर अध्यक्ष प्रतिक कांबळे, जेष्ठ नेते लक्ष्मणराव ढवळे आदि मान्यवर उपस्थित होते.

आखाडे यांनी आपल्या भाषणात अजित दादांच्या सर्वांगिण कलागुणांचा गौरव केला. दादा पश्चिम महाराष्ट्रात जन्मले असले तरी राज्याच्या प्रत्येक भागातील शेतकर्यांच्या प्रश्नांची जाण त्यांना होती. प्रश्न समजून घेवून त्याची उकल करणारे दादा एक प्रकारचे चालते बोलते लोक न्यायालयच होते. त्यांच्या दरबारात होणार्या प्रत्येक बैठकीतून लोकहिताचाच निर्णय होत असे. छत्रपती शिवाजी महाराजांचे फक्त नाव न घेता त्यांचे विचार जगण्याचे काम दादानी केले. त्यांच्या मंत्रीमंडळात नेहमी सर्व जाती, धर्मांना स्थान मिळाले. पक्ष संघटनेत सुध्दा दादांनी अष्टप्रधान मंडळा प्रमाणे रचना केली होती. त्यांच्याकडे अद्भुत अशी चुंबकिय शक्ती होती. ज्यामुळे त्यांच्याशी जोडला गेलेला व्यक्ती किंवा कार्यकर्ता पुन्हा त्यांच्यापासून दूर गेला नाही.दादा या नावाप्रमाणेच ते अनेकांचे आधार बनले होते. माझी राजकिय आणि सामाजिक जीवनाची सुरुवात कम्युनिस्ट विचारातून झाली. कॉ.अतहर बाबर यांच्या सोबत मी काम सुरु केले. त्यानंतरच्या काळात गोपीनाथराव मुंडे यांनी मला राजकिय साथ दिली आणि आता माझे संपुर्ण भविष्य अजित दादांच्या नेतृत्वावर अवलंबून होते. हे तीनही नेते आज हयात नाहीत याची खंत आखाडे यांनी बोलून दाखवली. या कार्यक्रमात महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंतराव मुंडे यांनी अजित दादा पवार यांच्या कार्यशैलीचे वर्णन केले. बीडचे पालकमंत्री म्हणून जबाबदारी स्विकारल्यानंतर हा जिल्हा आता बारामती प्रमाणे विकासाच्या बाबतीत पुढे जाईल असा विश्वास जनतेमध्ये निर्माण झाला होता. मात्र आता बीडकरांची घोर निराशा झाली आहे.प्रसिध्दी माध्यमांनी सुरुवातीचे अनेक वर्ष अजित दादांची प्रतिमा चुकीच्या पध्दतीने बनवली.मात्र गेल्या काही वर्षात स्वतंत्र भूमिका घेतल्यापासून दादांनी प्रत्येकाच्या मनात घर केले होते. त्यांची विनोदी शैली, प्रशासनातील दरारा,जनतेचे प्रश्न सोडवण्याची हातोटी यामुळे ते लोकप्रियतेच्या शिखरावर पोहचले होते. त्यांच्या अचानक जाण्यामुळे महाराष्ट्र एका कर्तबगार मुख्यमंत्र्याला मुकला आहे असे मुंडे म्हणाले.

**अंबडमध्ये वकिलावर ...**

अंबडच नव्हे तर बीड येथील न्यायालयातही एका वकिलावर महिलांच्या साथीने हल्ला करण्यात आला.गेल्या वर्षभरात महाराष्ट्रात वकिलावर हल्ले धमक्या आणि काही ठिकाणी हत्यांच्या घटनांनी सीमा ओलांडली आहे. डॉक्टर,पत्रकार आणि शासकीय अधिकाऱ्यांना सरक्षण देणारे कायदे अस्तित्वात आहेत. मात्र न्यायव्यवस्थेचा मुख्य कणा असलेल्या वकिलांना अद्याप कायद्याचे सरक्षण नाही. वकील सरक्षण कायद्याचा मसुदा तयार असूनही शासन अमलबजावणी करण्यास दिरगाई करत आहे. वकील संघाच्या

## पान १ वरुन...

प्रमुख मागण्या: वकील संरक्षण कायदा तात्काळ मंजूर करून लागू करावा. वकिलांविरुद्धचे गुन्हे हे दखलपात्र आणि अजामीनपात्र करण्यात यावेत. या गुन्ह्यासाठी जास्तीत जास्त आणि कठोर शिक्षेची तरतुद असावी. ड.लक्ष्मण गायके यांच्यावर हल्ला करणाऱ्या आरोपीला त्वरित अटक व्हावी. तहसीलदारांना दिले निवेदन अंबड वकील संघाच्या वतीने तहसीलदार श्री.विजय चव्हाण साहेब यांना मुख्यमंत्र्याच्या नावे निवेदन देण्यात आले. या प्रसंगी अंबड वकील संघाचे अध्यक्ष ड.ज्ञानेश मुढे,उपाध्यक्ष ड. कृष्णा जाधव,सचिव ड. श्रीकांत काळबंडे यांच्यासह अंबड वकील संघाचे सर्व विधीतज्ञ मोठ्या संख्येने उपस्थित होते.वकील समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी लढतात, मात्र आज तेच असुरक्षित आहेत.जर लवकरात लवकर कठोर कायदा झाला नाही आणि आरोपींना जरब बसली नाही तर वकील संघ अधिक तीव्र आंदोलन छेडेल,

अंबड वकील संघ

**स्थानिक गुन्हे शाखेने ....**

तांबोळी रा. चांदणेवस्ती बीड जि. बीड हा रेड पार्टीस पाहुन पळुन गेला. त्याच्या घराच्या बाजुच्या पत्र्याच्या शेडमध्ये व घरामध्ये विविध कंपनीचा महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधीत केलेला गुटखा किमंती अंदाजे

## पान १ वरुन...

३,५९,३८८/- रूपयाचा माल विक्री करण्यासाठी साठवुन ठेवलेला असतांना मिळुन आला. म्हणुन त्याचे विरूध्द पोलीस ठाणे पेठ बीड येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे.

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक बीड नवनीत काँवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, यांच्या आदेशाने पोउपनि श्रीराम खटावकर, पोह/ राहुल शिंदे, पोह/युनुस बागवान, पोह/गोविंद राख, मपोह/स्वाती मुडे, पोअ/अशपाक सय्यद, पोअ/मनोज परजणे, चालक पोह/नितीन वडमारे यांनी मिळून केली आहे.

**डोळ्यात चटणी....**


३,००,०००/- असे एकुण ५,४०,०००/- मुद्देमाल हस्तगत करण्यात आले आहे. वरील सहा आरोपी व मुद्देमाल पुढील तपासकामी पोलीस ठाणे युसुफ वडगाव यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरील कामगिरी ही नवनीत कॉवत, पोलीस अधीक्षक, बीड, श्रीमती चेतना तिडके, अपर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई, शिवाजी बटेवाड, स्थानिक गुन्हे शाखा, बीड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक महेश विघ्ने, पोलीस हवालदार जफर पठाण, महेश जोगदंड, दिलीप गिते, मारुती कांबळे, दिपक खाडेकर, गणेश मराडे, विकी सुरवसे यांनी मिळून केली आहे.

# निवृत्ती वडगावकर यांना 'ग्रंथ महर्षी गंगाधर पटने, जीवनगौरव सन्मान' जाहीर

मुखेड ।प्रतिनिधी

नांदेड जिल्हा ग्रंथालय संघ यांच्या २८ व्या वार्षिक अधिवेशनात यंदाचा प्रतिष्ठेचा 'ग्रंथ महर्षी गंगाधर पटने जीवनगौरव सन्मान' निवृत्ती वडगावकर यांना जाहीर करण्यात आला आहे. त्यांच्या निवडीमुळे ग्रंथालय क्षेत्रात आनंद व अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.



या अधिवेशनाच्या अध्यक्षस्थानी माजी शिक्षणमंत्री मा. कमलकिशोर कदम राहणार असून उद्घाटन रविंद्र चव्हाण, खासदार (नांदेड लोकसभा मतदारसंघ) यांच्या हस्ते होणार आहे. तसेच राहुल कर्डिले, जिल्हाधिकारी नांदेड, यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. मान्यवरांच्या उपस्थितीतच निवृत्ती वडगावकर यांना जीवनगौरव सन्मान प्रदान करण्यात येणार आहे.

ग्रंथालय चळवळीच्या उभारणीत व जतनात वडगावकर यांनी दिलेले योगदान उल्लेखनीय आहे. ग्रामीण भागात वाचन संस्कृती रुजविणे, ग्रंथालयांचे जाळे बळकट करणे आणि तरुण पिढीला ज्ञानसंपादनासाठी प्रोत्साहित करणे या क्षेत्रात त्यांनी दीर्घकाळ कार्य केले आहे. त्यांच्या कार्याची दखल घेत यापूर्वीही त्यांना सन १९८५ मध्ये 'ग्रंथालय भूषण' पुरस्कार तसेच सन १९८७ मध्ये 'तात्यासाहेब शेनई खटखटे ग्रंथालय पुरस्कार' प्रदान करण्यात आले होते.

हे अधिवेशन रविवार, दि. १ मार्च २०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता जनता हायस्कूल, नायगाव येथे आयोजित करण्यात आले आहे. या अधिवेशनात आजची समाजमाध्यमे, वाचन संस्कृती आणि आत्मनिर्भरता या विषयावर विशेष चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. तालुक्यातील ग्रंथपाल, वाचनप्रेमी नागरिक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असल्याचे आयोजकांनी कळविले आहे.

निवृत्ती वडगावकर यांना जाहीर झालेला हा सन्मान नांदेड जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब ठरत असून, ग्रंथालय चळवळीला नवी ऊर्जा देणारा ठरणार आहे.

# थार गाडी देतो म्हणून ४ लाखांना गंडा

पुण्याच्या दोघांनी अर्धापूरच्या शेतकऱ्याला लुटले

अर्धापूर (प्रतिनिधी)

चारचाकी थार गाडी स्वस्तात मिळवून देतो असे आमिष दाखवून अर्धापूर येथील एका शेतकऱ्याची ४ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी पुण्यातील दोन एजंटांविरुद्ध तक्रार दाखल करण्यात आली असून, बोगस चेक देऊन फसवणूक केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

अर्धापूर येथील तक्रारदार शेतकरी यांना चारचाकी गाडी घेण्यासाठी त्यांनी जुन्या गाड्यांचे खरेदी-विक्री करणारे एजंट प्रफुल प्रभाकर उबाळे आणि नारायण रामलू रामदीनवार दोघे रा. ईशा एम्पायर, चिंतामणी नगर, पुणे यांच्याशी संपर्क साधला. आरोपींनी व्हॉट्सपवर गाड्यांचे फोटो पाठवून तक्रारदाराचा विश्वास संपादन केला व ॲडव्हान्स म्हणून २५,१५० रुपये फोनपे द्वारे घेतले. नंतर गाडी फायनल झाल्याचे सांगून उर्वरित ३,७५,००० रुपये नारायण रामदीनवार यांच्या बँक' खात्यात ठढऋड द्वारे भरून घेतले.

पैसे मिळूनही गाडी देण्यास टाळाटाळ केली गेली. जेव्हा तक्रारदाराने पैशांचा तगादा लावला, तेव्हा प्रफुल उबाळे याने ६ जानेवारी २०२६ रोजीचा ४ लाखांचा धनादेश दिला. तक्रारदाराने हा चेक अर्धापूर येथील एका बँकेच्या जमा केला असता, संबंधित खात्यात पुरेशी रक्कम नसल्याने तो बाऊन्स झाला. जाणीवपूर्वक फसवणूक करण्याच्या उद्देशानेच हा बोगस चेक देण्यात आल्याचे स्पष्ट झाले आहे. गाडीही नाही आणि पैसेही परत मिळेनात अशा दुहेरी संकटात सापडलेल्या शेतकऱ्याने आता पोलिसांत धाव घेतली असून,शेतकरी स्वराज देशमुख यांच्या फिर्यादीवरून दोन्ही आरोपी विरूद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी पुढील तपास पोउनी सुरेश भोसले हे करीत आहेत.

# महाराष्ट्रात लवकरच 'एसआयआर' प्रक्रियेचा धडाका; मतदार याद्यांच्या शुद्धीकरणासाठी सज्ज व्हा: शहनवाज कुरेशी

## नागरिकांनी आपल्या भागातील बीएलओ कडे संपर्क साधून मतदार यादीतील नोंदींची खात्री करून घ्यावी, सामाजिक कार्यकर्ता शहनावज कुरेशी



परतूर ।प्रतिनिधी

देशातील मतदार याद्या अधिक अचूक, पारदर्शक आणि दोषमुक्त करण्यासाठी केंद्रीय निवडणूक आयोगाने कंबर कसली असून, बिहारमधील यशानंतर आता महाराष्ट्रासह २२ राज्यांमध्ये 'विशेष सखोल फेरपडताळणी प्रक्रिया' राबवली जाणार आहे. एप्रिल महिन्यापासून या मोहिमेला सुरुवात होणार असून, नागरिकांनी आणि प्रशासनाने यासाठी सज्ज राहावे, असे आवाहन सामाजिक कार्यकर्ता शहनवाज कुरेशी यांनी केले आहे. तसेच केंद्रीय निवडणूक आयोगातर्फे राबवण्यात येणारी 'मतदार यादी विशेष सखोल फेरपडताळणी प्रक्रिया' ही मतदार यादीतील त्रुटी दूर करण्यासाठी राबवली जाते. यात प्रामुख्याने दुबार नावे वगळणे. मृत व्यक्तींची नावे यादीतून काढणे. पत्त्यांमधील चुका दुरुस्त करणे. नव्या पात्र मतदारांची नोंदणी करणे. तसेच शहनवाज कुरेशी यांनी दिलेल्या माहितीनुसार, केंद्रीय निवडणूक आयोगाने गुरुवारी एक पत्र काढून महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणा, पंजाब, दिल्ली आणि जम्मू-काश्मीरसह २२ राज्ये व केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्य निवडणूक आयुक्तांना सज्जतेचे आदेश दिले आहेत. गेल्या वर्षी जून महिन्यात या प्रक्रियेचे नियोजन करण्यात आले होते. सध्या ९ राज्ये आणि ३ केंद्रशासित प्रदेशांत हे काम प्रगतीपथावर असून, एप्रिलपासून महाराष्ट्रात या मोहिमेचा जोर पाहायला मिळणार आहे. मतदान हा लोकशाहीचा पाया आहे आणि अचूक मतदार यादी हा त्या पायाचा कणा आहे. महाराष्ट्रात एप्रिलपासून 'एसआयआर' प्रक्रिया सुरू होण्याची शक्यता असल्याने, प्रत्येक पात्र नागरिकाने आपले नाव यादीत तपासून घ्यावे आणि प्रशासनाला सहकार्य करावे.असा शानवाज कुरेशी सामाजिक कार्यकर्ता यावेळी सांगितलेला आहे तसेच आयोगाने पाठवलेल्या पत्रात महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, हरियाणा, हिमाचल प्रदेश, झारखंड, कर्नाटक, ओडिसा, पंजाब, तेलंगणा आणि उत्तराखंड यांसारख्या महत्त्वाच्या राज्यांचा समावेश आहे. ईशान्येकडील आसाममध्ये १० फेब्रुवारी रोजीच विशेष पडताळणी प्रक्रिया पूर्ण झाली आहे. महाराष्ट्रात ही प्रक्रिया राबवण्यासाठी निवडणूक विभागाने आतापासूनच तयारी सुरू करावी, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. या प्रक्रियेनंतर संपूर्ण देशातील मतदार याद्यांचे शुद्धीकरण पूर्ण होणार आहे. नागरिकांनी आपल्या भागातील बीएलओ (इडज) कडे संपर्क साधून मतदार यादीतील नोंदींची खात्री करून घ्यावी, असे आवाहनही कुरेशी यांनी केले आहे.

# परतूर रेल्वे स्थानकावर प्रवाशांचे मरणयातना !

भव्य कामाचा गाजावाजा, पण प्लॅटफॉर्म अपुरा; देवगिरी एक्सप्रेसमधून उतरताना महिला-वृद्धांचे हाल

परतूर ।प्रतिनिधी

परतूर रेल्वे स्थानकावर सध्या अमृत भारत स्थानक योजनेअंतर्गत कोट्यवधी रुपयांची विकासकामे सुरू आहेत. मात्र, या भव्य दिव्य कामाच्या नियोजनात प्रवाशांच्या मूलभूत गरजांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याचे चित्र दिसत आहे. रेल्वे स्थानकावरील प्लॅटफॉर्मची लांबी कमी असल्यामुळे विशेषतः देवगिरी एक्सप्रेस सारख्या लांब पल्ल्याच्या गाड्यांमधून उतरताना प्रवाशांना, महिलांना आणि वृद्धांना जीव धोक्यात घालून उड्या टाकाव्या लागत आहेत. दररोज सकाळी जेव्हा देवगिरी एक्सप्रेस परतूर स्थानकावर येते, तेव्हा गाडीची एकूण लांबी आणि उपलब्ध प्लॅटफॉर्मची लांबी यामध्ये मोठी तफावत जाणवते. रेल्वेचे अनेक डबे प्लॅटफॉर्मच्या बाहेर उड्डाणपुलाजवळ थांबतात. तिथे प्लॅटफॉर्म नसल्यामुळे प्रवाशांना जमिनीवर उतरावे लागते. उंचावरून खाली उतरताना महिला, लहान मुले आणि वृद्ध प्रवाशांचे प्रचंड हाल होत आहेत. यामुळे एखादा मोठा अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच

नागरिकांनी या त्रासाचा व्हिडिओ बनवून सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल केला आहे. या व्हिडिओमध्ये प्रवासी कशा प्रकारे कसरत करत खाली उतरत आहेत, हे स्पष्ट दिसत आहे. स्थानकाचे सुशोभीकरण करण्यापेक्षा प्रवाशांना सुरक्षितपणे उतरता येईल इतपत प्लॅटफॉर्मची लांबी वाढवणे जास्त गरजेचे आहे, अशा संतप्त प्रतिक्रिया परतुर कर व्यक्त करत आहेत. तसेच



नागरिकांची मुख्य मागणी १. सुरू असलेल्या नवीन कामामध्ये प्लॅटफॉर्मची लांबी तातडीने वाढवण्यात यावी २. उड्डाणपुलाच्या दिशेने डबे उभे राहतात, तिथेही प्लॅटफॉर्मचा विस्तार करावा ३. प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी रेल्वे प्रशासनाने तात्काळ या समस्येकडे लक्ष द्यावे. दक्षिण मध्य रेल्वे प्रशासनाने या गंभीर विषयाची दखल घेऊन प्लॅटफॉर्मची लांबी वाढून देऊन परतूरच्या नागरिकांना सहकार्य करावा

# माहोरा गावातील मटका-जुगारावर पोलिसांचा मोठा दावा

## कागदोपत्री कारवाई की प्रत्यक्षात कारभार सुरूच

जाफराबाद ।प्रतिनिधी

तालुक्यातील माहोरा गावात सुरू असलेल्या मटका व जुगार प्रकरणावरून पुन्हा एकदा प्रशासनाच्या कारवाईवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. ग्रामस्थांच्या तक्रारीनंतर पोलीस ठाणे जाफराबाद यांनी वरिष्ठांना सादर केलेल्या अहवालात मटका-जुगारावर कारवाई केल्याचा दावा करण्यात आला आहे. मात्र गावकऱ्यांच्या म्हणण्यानुसार कारवाईचे कागद वेगळे आणि प्रत्यक्ष परिस्थिती वेगळी अशी संतप्त प्रतिक्रिया उमटत आहे.

सलग गुन्हे दाखल पण धंदा थांबला का

अहवालानुसार २०२५ मध्ये गुन्हा क्रमांक ३४/२०२५, ९७/२०२५, २६९/२०२५ आदी प्रकरणांमध्ये महाराष्ट्र जुगार कायदा कलम १२(अ) अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले. तसेच काही प्रकरणांत महाराष्ट्र दारू कायदा कलम ६५ (ई) अंतर्गतही कारवाई केल्याचे नमूद आहे.

पोलिसांनी अहवालात स्पष्ट केले आहे की मटका-जुगार चालविणाऱ्यांवर वेळोवेळी धाड टाकून प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली असून संबंधितांविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे.



परंतु ग्रामस्थांचा आरोप आहे की, काही दिवस कारवाईची धडक दाखवून पुन्हा तोच प्रकार सुरू होतो. गावातील तरुण पिढी या व्यसनाधीनतेच्या गर्तेत ओढली जात असून सामाजिक वातावरण बिघडत असल्याची तक्रार आहे.तक्रारींचा पाऊस तरीही प्रश्न कायम

ऑनलाईन तक्रारींच्या आधारे पोलिसांनी वरिष्ठांकडे सविस्तर अहवाल सादर केला आहे. मात्र ग्रामस्थ विचारत आहेत

जर इतकी कडक कारवाई झाली तर धंदा पूर्णपणे बंद का झाला नाही ?

पोलीस ठाण्याने प्रतिबंधात्मक कारवाई धाड आणि गुन्हे दाखल केल्याचा दावा केला असला तरी गावकऱ्यांच्या मते स्थानिक पातळीवर अजूनही सावधपणे मटका-जुगार सुरू असल्याची चर्चा आहे.

प्रशासनाने द्यावे ठोस उत्तर

माहोरा गावातील परिस्थितीवरून एक गोष्ट स्पष्ट होते केवळ कागदोपत्री आकडेवारी पुरेशी नाही प्रत्यक्षात जुगाराचा समूळ बंदोबस्त होणे गरजेचे आहे. अन्यथा कारवाईचे दाखले आणि प्रत्यक्ष वास्तव यातील दरी वाढतच जाईल.

आता जिल्हा पोलीस प्रशासनाने या प्रकरणाची सखोल चौकशी करून ठोस आणि कायमस्वरूपी उपाययोजना करणे आवश्यक असल्याची मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.माहोरा गावातील मटका-जुगार प्रकरणात पुढे काय घडते याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# राष्ट्रीय सेवा योजनेचे वार्षिक शिबिराचे गोणेगाव येथे समारोप समारंभ संपन्न

मुक्रमाबाद (प्रतिनिधी)

दि.२८ फेब्रुवारी २०२६ रोजी स्वामी विवेकानंद महाविद्यालय मुक्रमाबाद येथील राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष वार्षिक शिबिर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मौजे गोणेगाव ता.मुखेड या ठिकाणी दिनांक २२ फेब्रुवारी ते २८ फेब्रुवारी २०२६ या दरम्यान संपन्न झाले. आज राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या विशेष वार्षिक शिबिराचा समारोप समारंभ संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विवेक इनामदार हे उपस्थित होते तर प्रमुख पाहुणे म्हणून मुक्रमाबाद पोलीस स्टेशनचे सहा. पोलीस निरीक्षक मा.राजेश चव्हाण साहेब उपस्थित होते. तसेच व्यासपीठावर गोनेगाव येथील सरपंच सौ. लक्ष्मीबाई भाऊराव डोरनाळे, श्री बालाजी पाटील, गोविंद दिंडे, पोलीस पाटील विष्णुपंत गंदीगुडे, मुख्याद्यापक पांडुरंग धरणे, डॉ श्रीराम राजुरे, व पत्रकार श्री.बस्वराज वंटगिरे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला स्वामी रामानंद तीर्थ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ.मा.म.




गायकवाड यांनी केले. प्रास्ताविकपर माहिती देतांना डॉ मारोती गायकवाड यांनी सात दिवसांमध्ये स्वयंसेवक विद्यार्थ्यांनी केलेल्या कामाचा आढावा उपस्थित मान्यवरांच्या समोर सादर केला. यामध्ये ग्राम स्वच्छता,सर्वरोग निदान शिबिर, व पशु चिकित्सा,उद्बोधन पर भाषणे व इ.सामाजिक पैलूवर केलेल्या कार्याची माहिती दिली.

सापोनि राजु चव्हाण साहेब यांचे विद्यार्थी व उपस्थितांना मार्गदर्शन

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षांची तयारी करताना विद्यार्थ्यांनी आपले ध्येय उद्दिष्ट समोर ठेवून अभ्यास करावा तसेच मोबाईलचा वापर अतिरिक्त करू नये मोबाईलचा वापर करताना वेगवेगळ्या अनोळखी साईटचा वापर करू नये व तसेच मोबाईलच्या अतिरिक्त वापराचे गंभीर परिणाम आपल्या जीवनावर होतात याशिवाय कोणत्याही पोस्ट शेअर करताना त्या आपण वाचूनच पाठवावेत अन्यथा चुकीच्या पोस्ट जर इतर ग्रुप वर पाठवल्या गेल्या तर त्याचे परिणाम गंभीरपणे भोगावे लागतात अशा प्रकारची वेगवेगळी उदाहरणे त्यांनी उपस्थित विद्यार्थी व गावकरी यांना दिले. त्याचबरोबर अठरा वर्षाखालील मुलींचे लग्न करणे कायद्याने गुन्हा आहे. आणि म्हणून प्रत्येक पालकांनी काळजी घेणे गरजेचे आहे. तसेच लहान मुलांच्या मुलींच्या बाबतीत लैंगिक अत्याचार होत असतील तर पालकांनी सतर्क राहून संबंधितावर त्वरित कारवाई करण्यासाठी पोलिसांना संबंधितांची माहिती द्यावी असे आवाहन केले. या कार्यक्रमात विद्यार्थिनी मनीषा सूर्यवंशी या विद्यार्थिनीने सात दिवशीय शिबिरातील आपला अनुभव व्यक्त केले.

प्राचार्य डॉ. विवेक इनामदार यांनी विद्यार्थी व पालकांना समाज उपयोगी वेगवेगळ्या मूल्यांवर माहिती दिली. रासेयो शिबिरार्थी विद्यार्थ्यांनी केलेल्या कामाचे कौतुक केले. या कार्यक्रमाचे सुरेख सूत्रसंचालन रासेयो सह. कार्यक्रमाधिकारी डॉ.आर.बी. मादळे यांनी केले. यावेळी महाविद्यालयातील सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ.आर.बी. बाविस्कर, माजी रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ.एस.एल. सकनुरे , बालाजी सादगिरे, विद्यार्थी अंकुश पारसे, रोशन सोनकांबळे, बेंजलवार यशपाल, सुरज भिंगोले, मनीषा सूर्यवंशी, ऐश्वर्या, प्रियंका गायकवाड यांनी सदरील कॅम्प यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, गावातील नागरिक व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्व उपस्थितांचे आभार डॉ.बी.पी.खराबे यांनी मानले. शेवटी राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# भागूजीराव ढेकळे विद्यालयात शिवाजी धट यांचा सेवापुर्ती गौरव सोहळा संपन्न



गेवराई ।प्रतिनिधी

तालुक्यातील पाडळसिंगी येथील कृषि पंडित भागूजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे सहशिक्षक शिवाजी श्रीरंग धट हे नियत वयोमानानुसार ३३ वर्षाच्या प्रदिर्घ सेवेनंतर दि.२८ फेब्रुवारी रोजी सेवानिवृत्त झाल्यामुळे त्यांचा शाळेच्या वतीने सेवापूर्ती सन्मान सोहळा संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य थिटे ए. एस. हे होते.

शिवाजी श्रीरंग धट हे जून १९९३ साली साक्षाळपिंप्री माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, साक्षाळपिंप्री येथे सहशिक्षक म्हणून नेमणूक झाल्यानंतर तेथे ७ वर्ष सेवा केली. त्यानंतर यशवंत माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, कुर्ला येथे ४ वर्ष सेवा केली. दि.२२/०७/२००४ ते आतापर्यंत कृषि पंडित भागूजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, पाडळसिंगी येथे सेवा करून शनिवार दि.२८ फेब्रुवारी रोजी सेवानिवृत्त झाले. सेवानिवृत्तीच्या सेवापूर्ती गौरव सोहळ्याला प्रमुख अतिथी म्हणून ह.भ.प.रमेश महाराज आटपळे, किशोर काळकुटे, गिन्यानदेव चौधरी, बळीराम साबळे, राम भांडवलकर, बाबासाहेब दाभाडे, सोमिनाथ पवार, त्रिंबकराव घोडके, वसंतराव ढेंगळे, मकरंद इंगोले, दिपक लाटे, विनायक नन्नवरे, वसंत काटे, रामेश्वर डोंगरे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी रूपाली बजगुडे, संध्या शेळके, राजेंद्र करवंदे, अविनाश पोकळे, दिलीप पोकळे, मुख्याध्यापक आर.पी. भोसले, प्रल्हाद नरवडे, राजेंद्र रांजवण, सी.आर. भोसले, सुभाष गायकवाड, डॉ.कल्याण इंगोले, धर्मराज मागदे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सत्काराला उत्तर देताना धट यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला. या प्रवासात जे काही कमावले याची पावती मला मिळाली आहे असे सांगून वर्गमैत्रिचा उजाळा देऊन आदर्श शिक्षण संस्थेबद्दल ऋण व्यक्त केले. अध्यक्षीय समारोप प्रसंगी बोलताना प्राचार्य थिटे म्हणाले की, शालेय पोषण विभाग धट सरांनी जबाबदारीने सांभाळला, कोणतीही काम करत असताना अतिशय नम्रपणे काम पुर्ण केलेले आहे असे सांगून पुढील आयुष्य त्यांना सुखसमाधानाचे आणि निरोगी जावो अशा शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी आर.आर.सोनवणे, सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी, शिवाजी दाभाडे, लक्ष्मण दाभाडे, पांडुरंग तकीक, गजानन आढाव, मुकुंद कुलकर्णी, हरीभाऊ मेडकर आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन चंद्रशेखर जामकर यांनी केले तर प्रास्ताविक प्रा.श्रीराम जाधव यांनी केले. शेवटी रामदास घोरड यांनी उपस्थितांचे आभार मानले.




# तुलसी इंग्लिश स्कूलमध्ये राज्यभाषा गौरव दिन उत्साहात साजरा

बीड (प्रतिनिधी): देवगिरी प्रतिष्ठान संचलित तुलसी इंग्लिश स्कूल, बीड येथे शुक्रवार, दिनांक २७ रोजी राज्यभाषा गौरव दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला शाळेच्या प्राचार्या उमा जगतकर यांच्या हस्ते ज्येष्ठ साहित्यिक विष्णू वामन शिरवाडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यानंतर विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभूषेत ग्रंथ दिंडी काढून मराठी भाषेचा जागर केला. विद्यार्थ्यांनी विविध साहित्यिकांचे फोटो, घोषवाक्ये आणि मराठी भाषेचा गौरव करणारे फलक हातात घेऊन शाळा परिसरात उत्साहपूर्ण फेरी काढली. जय मराठी, माझी भाषा - माझा अभिमान अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.

यावेळी विद्यार्थ्यांनी मराठी भाषेचे महत्त्व, तिची समृद्ध परंपरा आणि साहित्य वारसा याविषयी मनोगते व्यक्त केली. काही विद्यार्थ्यांनी कुसुमाग्रज यांच्या कवितांचे प्रभावी वाचन करून उपस्थितांची मने जिंकली.

प्राचार्या उमा जगतकर यांनी आपल्या भाषणात मराठी भाषेचे महत्त्व, तिची परंपरा व साहित्य वारसा यावर प्रकाश टाकला. मराठी ही आपल्या संस्कृतीचे प्रतीक असून विद्यार्थ्यांनी तिचा अभिमानाने वापर करून तिचा गौरव वाढवावा, असे त्यांनी आवाहन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्योस्ताना राठोड तसेच शर्मिला मुंडे यांनी केले. आभार प्रदर्शन सहशिक्षिका ऋतुजा उगले यांनी मानले. कार्यक्रमास शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पोलीस पाटील पदभरती मुलाखती पारदर्शक पद्धतीनेच ;आमिषांना बळी पडू नका

## तहसीलदार वैशाली पाटील यांचे आवाहन

आष्टी (प्रतिनिधी)

आष्टी तालुक्यातील पोलीस पाटील पदभरती प्रक्रियेअंतर्गत दि. ०१ मार्च २०२६ ते दि. ०८ मार्च २०२६ या कालावधीत मुलाखती आयोजित करण्यात आल्या असून, पात्र उमेदवारांची यादी अधिकृतरीत्या जाहीर करण्यात आलेली आहे. या पार्श्वभूमीवर काही व्यक्तींमार्फत मुलाखतीत जास्त गुण मिळवून देण्याचे आमिष दाखविले जात असल्याच्या तक्रारी प्रशासनाकडे प्राप्त झाल्या आहेत.



या संदर्भात आष्टीच्या तहसीलदार श्रीमती वैशाली पाटील यांनी स्पष्ट आणि ठाम भूमिका मांडली आहे. त्यांनी सांगितले की, मुलाखतीतील गुणदानाची पद्धत, निकष व संपूर्ण कार्यपद्धती याबाबतची माहिती संबंधित अधिकृत संकेतस्थळावर यापूर्वीच प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. गुणदान प्रक्रिया शासनाच्या नियमानुसार, ठरलेल्या निकषांनुसार आणि पूर्णपणे पारदर्शक पद्धतीनेच राबविण्यात येणार आहे. कोणत्याही प्रकारे बाह्य हस्तक्षेप अथवा अनधिकृत प्रभावास स्थान दिले जाणार नाही.

तहसीलदारांनी पुढे सांगितले की, उमेदवारांनी कोणत्याही व्यक्तीच्या आमिषाला, अफवांना किंवा चुकीच्या माहितीला बळी पडू नये. शासनाच्या पदभरती प्रक्रियेत लाचलुचपत किंवा बेकायदेशीर मार्गांचा अवलंब केल्यास संबंधितांविरुद्ध कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. अशा प्रकारच्या फसवणुकीच्या प्रयत्नांमध्ये सहभागी होणाऱ्या व्यक्तींवर फौजदारी गुन्हे दाखल होऊ शकतात, याचीही त्यांनी जाणीव करून दिली.

मुलाखतीदरम्यान किंवा त्यापूर्वी कोणत्याही संशयास्पद हालचाली, आमिषे किंवा आर्थिक व्यवहाराची मागणी झाल्यास संबंधित उमेदवारांनी तात्काळ तहसील कार्यालय किंवा पोलीस प्रशासनाच्या निदर्शनास बाब आणावी, असे आवाहनही तहसीलदार वैशाली पाटील यांनी केले आहे. पोलीस पाटील पदभरती ही गावपातळीवरील महत्त्वाची जबाबदारीची नियुक्ती असल्याने संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक, निःपक्षपाती आणि कायदेशीर चौकटीत पार पडावी, यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.



कु. आरोही योगेश बेद्रे हिस वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देतांना श्री. राजेंद्र लाड, श्री. अण्णासाहेब साबळे, श्री. अनिल बेद्रे, आरोही ट्रेडर्स, धानोरा चे मालक योगेश बेद्रे दिसत आहेत.

# गांधी महाविद्यालय कडा येथे जागतिक मराठी भाषा दिन उत्साहात साजरा

आष्टी (प्रतिनिधी)

गांधी महाविद्यालय कडा येथे जागतिक मराठी भाषा दिन अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. मराठी भाषेच्या समृद्ध परंपरेचा गौरव आणि तिच्या संवर्धनाचा संकल्प यासाठी आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली.




कार्यक्रमाच्या प्रारंभी महाविद्यालयाचे आदरणीय प्राचार्य डॉ. ज. मो. भंडारी यांच्या हस्ते ज्येष्ठ साहित्यिक कुसुमाग्रज (तात्यासाहेब शिरवाडकर) यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी बोलताना प्राचार्य भंडारी यांनी सांगितले की, मराठी ही महाराष्ट्राची राजभाषा असून तिचा वारसा अत्यंत समृद्ध आणि अभिमानास्पद आहे. दरवर्षी कुसुमाग्रज यांच्या जयंतीनिमित्त २७ फेब्रुवारी रोजी मराठी भाषा दिन साजरा केला जातो. कुसुमाग्रज यांनी आपल्या साहित्यसंपदेच्या माध्यमातून मराठी भाषेला जागतिक पातळीवर पोहोचवले. त्यांचे साहित्य मराठी संस्कृतीचा आणि विचारविश्वाचा मानबिंदू आहे, असे त्यांनी नमूद केले. कुसुमाग्रज यांच्या विशाखा या काव्यसंग्रहाला प्रतिष्ठेचा ज्ञानपीठ पुरस्कार मिळालेला आहे, ही मराठी साहित्यासाठी अभिमानाची बाब असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच कणा आणि गर्जा जयजयकार क्रांतीचा या त्यांच्या कविता आजही तरुण पिढीला प्रेरणा देणाऱ्या आहेत, असे विचार त्यांनी व्यक्त केले. मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. अनिल गर्जे यांनी प्रास्ताविकात मराठी भाषेचे महत्त्व अधोरेखित केले. मराठी भाषा आपल्या भावविश्वाला आकार देते आणि विचारांना दिशा देते. मराठीचा गौरव म्हणजे आपल्या परंपरेचा आणि प्रगत विचारांचा गौरव होय. या निमित्ताने मराठी भाषेचा सन्मान राखण्याचा व तिच्या संवर्धनासाठी कटिबद्ध राहण्याचा संकल्प करूया, असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. तुकाराम गोंदकर यांनी प्रभावीपणे केले, तर आभारप्रदर्शन डॉ. अशोक कोरडे यांनी मानले.

या कार्यक्रमास प्रा. डॉ. अशोक कोरडे, प्रा. डॉ. श्रीकांत मगर, प्रा. डॉ. किशोर कोईनकर, प्रा. डॉ. किशोर चौधरी, प्रा. डॉ. तुकाराम गोंदकर, प्रा. डॉ. इनुस सय्यद, प्रा. दादा धलपे, प्रा. सचिन ढगे, डॉ. प्रशांत मेहेर, प्रा. दत्तात्रय हारकर, प्रा. डॉ. राजकुमार थोरवे, प्रा. डॉ. नरेंद्र गवळी, प्रा. डॉ. विष्णुपंत गव्हाणे, प्रा. डॉ. आशिष कटारिया, श्री. वाल्मीक तरटे, श्री. रंगनाथ शिंदे, प्रा. डॉ. सुदाम जाधव, प्रा. डॉ. शिवाजी जगदाळे यांच्यासह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कर्मचारीवृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या माध्यमातून मराठी भाषेच्या जतन-संवर्धनाचा संदेश देण्यात आला आणि विद्यार्थ्यांमध्ये भाषाभिमान जागृत करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

# शेख शरीफ हारुन यांची सलग नवव्यांदा सभापतीपदी वर्णी

## आ.सुरेश आण्णा धस यांचा विश्वास पुन्हा अधोरेखित

आष्टी (प्रतिनिधी)

आष्टी नगरपंचायतीतील विषय समिती सभापती पदांच्या निवडीत यंदाही जैसे थे स्थिती कायम राहिली असून, विद्यमान सभापतींनाच पुन्हा संधी देण्यात आली आहे. या निवड प्रक्रियेत कोणताही मोठा फेरबदल न करता जुन्या चेहऱ्यांवर विश्वास दाखविण्यात आला. विशेष म्हणजे आ. सुरेश आण्णा धस यांचे अत्यंत विश्वासू नगरसेवक शेख शरीफ हारुन यांची सलग नवव्यांदा सभापतीपदी नियुक्ती होत त्यांनी एक विक्रमच प्रस्थापित केला आहे.



नगरपंचायतीतील या निवडीकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले होते. दरवर्षी सभापती पदाची निवड होत असली तरी यंदाच्या प्रक्रियेत आ. धस यांच्या मार्गदर्शनाखाली अनुभवी आणि कामगिरी सिद्ध केलेल्या पदाधिकाऱ्यांनाच पुन्हा जबाबदारी देण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे नगरपंचायतीत सातत्य आणि स्थैर्य राखण्यावर भर दिल्याचे स्पष्ट झाले आहे.

शेख शरीफ हारुन हे आ. सुरेश आण्णा धस यांचे अत्यंत विश्वासू सहकारी म्हणून ओळखले जातात. नगरविकासाच्या विविध कामांत त्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला आहे. शहरातील पायाभूत सुविधा, स्वच्छता मोहिमा, पाणीपुरवठा, रस्ते दुरुस्ती आदी विषयांवर त्यांनी सातत्याने काम केले आहे. त्यांच्या कार्यशैलीची दखल घेतच आ. धस यांनी त्यांना पुन्हा एकदा सभापतीपदाची जबाबदारी दिली आहे. सलग नऊ वेळा सभापतीपद मिळविण्याचा मान मिळविणारे ते दुर्मीळ पदाधिकारी ठरले आहेत.

या निवडीबाबत शहरात अशी चर्चा आहे की, गेल्या वर्षभरातील कामगिरी आणि जनतेशी असलेला थेट संपर्क लक्षात घेऊनच हा निर्णय घेण्यात आला. शेख शरीफ हारुन यांनी विकासकामांमध्ये सातत्य राखत नगरसेवक व प्रशासन यांच्यात समन्वय साधला. त्यामुळेच त्यांच्या कामाची पावती म्हणूनच त्यांना नवव्यांदा संधी देण्यात आल्याचे बोलले जात आहे. निवडीबाबत अधिक माहिती देताना नगराध्यक्षांनी सांगितले की, आ. सुरेश धस यांच्या मार्गदर्शनाखाली ही प्रक्रिया पार पडली. कोणत्याही प्रकारचा बदल न करता जे सभापती ज्या खात्यावर कार्यरत होते, त्यांनाच त्याच जबाबदाऱ्या कायम ठेवण्यात आल्या आहेत. सातत्यपूर्ण कामामुळे शहराच्या विकासाला गती मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

मराठवाडा भूषण, लोकनेते, बहुजनांचे नेते म्हणून ओळख असलेले आ. सुरेश आण्णा धस यांनी सर्वसमावेशक नेतृत्वाचा आदर्श पुन्हा एकदा दाखवून दिला आहे. कार्यकर्त्यांच्या कामाची योग्य दखल घेत त्यांना सातत्याने संधी देण्याची त्यांची भूमिका यानिमित्ताने अधोरेखित झाली आहे. या निवडीनंतर नव्याने नियुक्त सभापतींचे सर्व स्तरातून अभिनंदन होत असून, आष्टी शहराच्या विकासकामांना अधिक वेग मिळेल, अशी अपेक्षा नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

# कवी कुसुमाग्रज यांनी साहित्यामधून जोपासली मानवी मूल्ये- प्रा.बसवराज कोरे

जालना ।प्रतिनिधी

ज्येष्ठ साहित्यिक,ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कवी कुसुमाग्रज वि.वा.शिरवाडकर यांच्या साहित्यविश्वात गांधीवादी विचारांचा प्रभाव प्रकर्षाने जाणवतो.त्यांच्या प्रत्येक साहित्यकृतीतून मानवी मूल्यांची जपणूक आणि सर्वसामान्यांच्या वेदनांना दिलेला आवाज स्पष्ट दिसतो असे प्रतिपादन प्रा. बसवराज कोरे यांनी केले.

अंकुशराव टोपे महाविद्यालयातील मराठी भाषा व वाङ्मय विभागाच्या वतीने कवी कुसुमाग्रज यांच्या जयंतीनिमित्त मराठी भाषा गौरव दिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.संजय पाटील यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

मराठी रंगभूमीचे वैभव

यावेळी बोलताना प्रा.कोरे म्हणाले की वि.वा.शिरवाडकर हे मराठी रंगभूमीला लाभलेले अनमोल वैभव होते.त्यांची नटसम्राट ही नाट्यकृती साहित्य क्षेत्रात अजरामर ठरली आहे. समाजातील सर्व स्तरांपर्यंत पोहोचणारा



आणि मानवी मनाचा वेध घेणारा लेखक म्हणून त्यांची ख्याती होती.

गर्जा जयजयकार क्रांतीचा गर्जा जयजयकार ही त्यांची ओजस्वी कविता आजही प्रेरणा देणारी आहे.त्यांच्या लेखणीतून सर्वसामान्यांच्या दुःखाचे प्रभावी चित्रण झाले असून समाजमनाला जागृत करणारी ताकद त्यांच्या साहित्यामध्ये असल्याचे प्रा.कोरे यांनी नमूद केले.जनजागृतीची परंपरा पुढे नेणारे कवी

अध्यक्षीय समारोपात डॉ.संजय पाटील म्हणाले की प्राचीन संतांनी मराठी भाषेच्या माध्यमातून समाजप्रबोधनाचे कार्य केले.त्याच परंपरेला आधुनिक काळात कुसुमाग्रज यांनी आपल्या साहित्यकृतींमधून नवी दिशा दिली.त्यांच्या साहित्याने सामाजिक जाणीवा अधिक प्रगल्भ केल्या.

कार्यक्रमाची रूपरेषा

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभागप्रमुख डॉ.पंडित रानमाळ यांनी केले.सूत्रसंचालन प्रा. कृष्णा बनसोडे यांनी तर आभार प्रदर्शन प्रा.अविनाश भालेराव यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. पंडित रानमाळ,प्रा.अविनाश भालेराव,प्रा.कृष्णा बनसोडे,प्रा. दीपक कारके यांनी विशेष परिश्रम घेतले.

या प्रसंगी डॉ.कार्तिक गावंडे, डॉ.रामदास वैद्य,डॉ.सुजाता देवरे,डॉ.सीमा निकाळजे,डॉ. रामनाथ सांगुळे,डॉ.अर्जुन जाधव,डॉ.संतोष करवंदे,डॉ. शंकर तिकांडे,सुरेश चव्हाण यांच्यासह प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


# ८ वर्षांच्या माहीरा गणी शेखचा पहिला रोजा संपन्न

कुटुंबीयांकडून कौतुक;परिसरात आनंदाचे वातावरण

आष्टी (प्रतिनिधी)

अवघ्या ८ वर्षांच्या चिमुकल्या माहीरा गणी शेख हिने अत्यंत श्रद्धा, संयम आणि उत्साहाने आपला पहिला उपवास (रोजा) पूर्ण करत कुटुंबियांचा अभिमान वाढवला आहे. लहान वयातच धार्मिक संस्कारांची जपणूक करत माहीराने पहिलाच रोजा यशस्वीरीत्या पूर्ण केल्याने परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

रमजान महिन्याला इस्लाम धर्मात विशेष महत्त्व असून, या पवित्र महिन्यात मुस्लिम बांधव रोजा ठेवून ईश्वरभक्ती, संयम आणि आत्मशुद्धीचा संदेश आचरणात आणतात. पहाटेच्या सहरीपासून ते सायंकाळच्या इफ्तारपर्यंत अन्न व पाणी त्यागून संयम पाळला जातो. अशा या कठीण उपवासाचे पालन



माहीराने हसतमुखाने आणि प्रामाणिक श्रद्धेने केले.

पहिल्या रोज्याच्या निमित्ताने माहीराने गुलाबी रंगाचा पारंपरिक पोशाख परिधान केला होता. फुलांच्या हारांनी सजलेली माहीरा अत्यंत देखणी दिसत होती. कुटुंबीयांनी तिचे विशेष कौतुक करत तिला शुभेच्छा व आशीर्वाद दिले. रोजा पूर्ण झाल्यानंतर सायंकाळी इफ्तारच्या वेळी घरात विशेष तयारी करण्यात आली होती. कुटुंबीय, नातेवाईक यांनी तिचे अभिनंदन करत पुढील आयुष्यातही अशीच श्रद्धा आणि सातत्य राखावे, अशा शुभेच्छा दिल्या. माहीराचे वडील गणी शेख यांनी सांगितले की, लहानपणापासूनच मुलांमध्ये धार्मिक व नैतिक मूल्यांची जाणीव निर्माण व्हावी, हा आमचा प्रयत्न असतो. माहीराने स्वतःहून रोजा ठेवण्याची इच्छा व्यक्त केली आणि तिने तो पूर्ण केल्याचा आम्हाला अभिमान आहे. लहान वयातच संयम, श्रद्धा आणि आत्मनियंत्रणाचे महत्त्व समजून घेत माहीरा गणी शेख हिने पहिल्या रोज्याद्वारे एक आदर्श घालून दिला आहे.




# श्री घृष्णेश्वर महादेव मंदिर येथे त्रिदिनी कीर्तन महोत्सवाची भक्तिमय सांगता

ताड हदगाव ।प्रतिनिधी

लोभाजी घनशीराम भाकरे वस्तीवरील श्री घृष्णेश्वर महादेव मंदिर येथे पांडुरंगाच्या कृपेने आयोजित त्रिदिनी कीर्तन महोत्सव आणि संगीतमय शिवपुराण कथेची काल्याच्या कीर्तनाने अत्यंत भावपूर्ण वातावरणात सांगता झाली. तीन दिवस मंदिर परिसर हरिनामाच्या गजराने टाळ-मृदुंगाच्या नादाने आणि भक्तिरसाच्या लहरींनी दुमदुमून गेला.

परमपूज्य १००८ ब्रह्मलीन कार्तिक स्वामी भारती बाबाजी श्रीक्षेत्र वनारसी व शिवयोगी भोले बाबा श्रीक्षेत्र सिद्धेश्वर पिंपळगाव यांच्या कृपाशीर्वादाने तसेच स्वामी संबीत चैतन्य भारती बाबाजी आणि सुरेशजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली हा धार्मिक सोहळा मोठ्या भक्तिभावात पार पडला.

मान्यवरांची उपस्थिती

कार्यक्रमास ताडहदगाव जिल्हा परिषद सदस्य नंदकिशोर पिंगळे, एसके न्यूजचे प्रतिनिधी श्रीधर कापसे, लोकशाही न्यूजचे आकाश जळके, साप्ताहिक आदर्श जालनाचे संपादक नाजीम सय्यद आदी मान्यवरांनी उपस्थित राहून महोत्सवाची शोभा वाढवली.

त्रिदिनी कीर्तनाचे वेळापत्रक

२४ फेब्रुवारी २०२६ सोपान महाराज फुके यजमान रामदास त्रिंबक मुळे २५ फेब्रुवारी २०२६ दिनकर महाराज चिमणे यजमान: रामा त्रिंबक जाधव दररोज सकाळी ९ ते ११ कीर्तन २६ फेब्रुवारी २०२६ ह.भ.प. सर्जेराव महाराज गिरी यजमान: पांडुरंग भगवान पुरी सकाळी ११ ते १ या वेळेत काल्याचे कीर्तन संपन्न. संगीतमय शिवपुराण कथेचे रसाळ निरूपण ह.भ.प. अर्जुन महाराज चौरे आणि शिवनाथ महाराज जाधव यांनी केले. त्यांच्या प्रभावी वाणीने उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले. संत तुकाराम महाराज यांच्या अभंगावर प्रभावी प्रबोधन कीर्तनात याल तर यारी लागे अवघे माझ्या मागे मागे आजी देतो पोटभरी पुरे म्हणाल तोवरी या संत तुकाराम महाराज यांच्या अभंगावर निरूपण करताना महाराजांनी भक्तीमार्गातील शिस्त,संयम आणि सदाचार यांचे महत्त्व अधोरेखित केले. हुंडाबळी, स्त्रीभ्रूणहत्या यांसारख्या सामाजिक विकृतींवर कठोर शब्दांत प्रबोधन करून समाजजागृतीचा प्रभावी संदेश देण्यात आला. काल्याच्या कीर्तनाचे धार्मिक व आध्यात्मिक महत्त्वही सविस्तर स्पष्ट करण्यात आले.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग अँड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बँक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# आदर्श इंग्लिश स्कूलमध्ये विज्ञानाचा जल्लोष

## राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त भव्य विज्ञान प्रदर्शन आईच्या नावाला ही प्रमाणपत्रात मानाचा मुजरा

जामखेड ।प्रतिनिधी

अंबड तालुक्यातील जामखेड येथील येथे २८ फेब्रुवारी रोजी राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साह जिज्ञासा आणि नवकल्पनांच्या वातावरणात साजरा करण्यात आला.भारतरत्न हि.व्ही.रमण यांनी शोधलेल्या रमण परिणामाच्या सन्मानार्थ साजऱ्या होणाऱ्या या दिनानिमित्त शाळेत भव्य व ज्ञानवर्धक विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.

विज्ञानाकडे प्रयोगातून वाटचाल

विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करणे कुतूहल जागविणे आणि प्रयोगशील वृत्तीला चालना देणे या उद्देशाने आयोजित या प्रदर्शनात इयत्ता पाचवी ते नववीपर्यंतच्या तब्बल ८० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

स्मार्ट कॅप,अंधश्रद्धेमागील विज्ञान,दिवस-रात्र निर्मिती, ज्वालामुखी मॉडेल, मानवी मेंदू, सूर्यमाला व खगोलीय वस्तू, वाहतूक व्यवस्था, आयोडिन क्लॉक अभिक्रिया, एलिफंट टूथपेस्ट, सुवाहक-दुर्वाहक, मानवी हृदय व श्वसन संस्था अशा विविध विषयांवरील मॉडेल्स आणि प्रयोगांनी उपस्थितांची अक्षरशः वाहवा मिळवली.

विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या प्रयोगांमधून विज्ञानाचे सजीव, व्यवहार्य आणि रोचक रूप प्रभावीपणे उलगडले. विज्ञान प्रयोगांची उपकरणे, सूक्ष्मदर्शक यांची स्वतंत्र मांडणी तसेच विज्ञान पुस्तक प्रदर्शनालाही पालक व विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन

कार्यक्रमाचे उद्घाटन मा. जि.प.स. जितेंद्र पालकर, सरपंच रतन तार्डे, उपसरपंच अमोल डोईफोडे, संस्थापक अध्यक्ष डॉ. जी. एस.



पांढरे, संचालिका आशा पांढरे, मुख्याध्यापिका प्रियंका बडजाते आदी मान्यवरांच्या हस्ते हि.व्ही.रमण व सरस्वती देवी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आले. या प्रदर्शनात मत्स्योदरी विद्यालय, जामखेड तसेच जिल्हा परिषद माध्यमिक उर्दू विद्यालय यांनीही सहभाग नोंदवत कार्यक्रमाची शोभा वाढवली.

महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर ऐतिहासिक निर्णययंदाच्या विज्ञान प्रदर्शनात शाळेने एक अत्यंत सकारात्मक आणि प्रेरणादायी निर्णय जाहीर केला. ८ मार्चच्या महिला दिनानिमित्त यापुढे शाळेत देण्यात येणाऱ्या प्रत्येक प्रमाणपत्रावर विद्यार्थ्यांच्या नावासोबत वडिलांच्या नावाबरोबरच आईचे नावही नमूद केले जाणार आहे. समानतेचा व स्त्री-सन्मानाचा संदेश देणाऱ्या या निर्णयाचे उपस्थितांनी जोरदार स्वागत केले.यशस्वी आयोजनासाठी परिश्रम

या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी निखिल पाटील, कृष्णा संसारे, सना इनामदार, विष्णू ईघवे, वर्षा पंडित, वर्षा जावळे, नवले मॅडम, खरात मॅडम, सोळुंके मॅडम, युवराज पांढरे, ओम पांढरे, अलफिनाज तांबोळी, भक्ती मॅडम, काळवने सर व जयसिंह पारे यांनी विशेष परिश्रम घेतले.राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त आयोजित या भव्य विज्ञान प्रदर्शनामुळे विद्यार्थ्यांच्या जिज्ञासेला नवे पंख मिळाले असून विज्ञानाकडे पाहण्याचा दृष्टीकोन अधिक व्यापक व सकारात्मक झाला आहे. प्रयोगातून शिकणे ही संकल्पना प्रत्यक्षात अनुभवताना विद्यार्थ्यांच्या भविष्यातील वैज्ञानिक वाटचालीला नक्कीच नवी दिशा मिळणार आहे.



## दावरवाडी ग्रामपंचायत मध्ये शासन आदेशानुसार प्रभाग रचना नियोजन बैठक संपन्न

दावरवाडी ।प्रतिनिधी

येथील ग्रुप ग्रामपंचायत कार्यालयात ग्रामपंचायत अधिकारी वसंत इंगळे तलाठी राम म्हस्के यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशासनाच्या आदेशानुसार शुक्रवार (दि.२७) ग्रामपंचायतिची प्रभाग रचना करण्यात आली.दावरवाडी ग्रामपंचायतीची सदस्य संख्या एकुण तेरा सदस्यांची असुन,पाच प्रभाग आहेत.यामध्ये दावरवाडीसह दावरवाडी तांडा,व डेरा यांचा समावेश असुन,सन २०११ च्या जनगणेनुसार (५४२७) एवढी लोकसंख्या आहे.

यावेळी जि.पस राजेंद्र वाघमोडे प्रशासक सरपंच ॲड डि डि जाधव, उपसरपंच प्रशांत देशमुख,माजी सरपंच शाम तांगडे, उत्तमराव खांडे, प्रकाश देशमुख,चंद्रभाण चोरमले, भगवानराव तांगडे नानासाहेब नाथा सोरमारे एडके, मिठू नन्नवरे विष्णु सोरमारे,विजय राऊत,युवराज एडके, गणेश गिरी,एस एल तांगडे आदी उपस्थित होते.

## माजी उपसभापती किसनराव मोरे यांची शिवसेना (शिंदे गट) उपजिल्हाप्रमुखपदी नियुक्ती

मंठा तालुक्यातील राजकारणात महत्त्वाचा समजला जाणारा फेरबदल घडला असून कृषी उत्पन्न बाजार समिती व पंचायत समितीच्या माध्यमातून गेली पंचवीस वर्षे सक्रिय राजकारणात कार्यरत असलेले काँग्रेसचे माजी उपजिल्हाध्यक्ष तथा माजी उपसभापती किसनराव मोरे यांची शिवसेना (शिंदे गट)च्या जालना उपजिल्हाप्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

या निवडीसाठी माजी मंत्री तथा आमदार अर्जुनराव खोतकर, डॉ .आमदार हिकमत दादा उडाण तसेच जिल्हाप्रमुख ए जे बोराडे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे आग्रही मागणी केली होती.त्यानुसार शिवसेना नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार दि. २६ फेब्रुवारी रोजी मुंबई येथे राज्याचे मंत्री संजय राठोड यांच्या हस्ते मोरे यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. या वेळी आमदार हिकमत उढाण, शिवसेना जिल्हाप्रमुख आसाराम बोराडे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक



प्रल्हादराव बोराडे,सुदर्शन सोळंके,तसेच तुळशीराम कुहिरे आदी मान्यवर उपस्थित होते.

किसनराव मोरे यांनी मंठा येथील कृषी उत्पन्न बाजार समिती आणि पंचायत समितीच्या माध्यमातून स्थानिक पातळीवर भक्कम राजकीय पाया निर्माण केला आहे. शेतकरी, व्यापारी व सर्वसामान्य नागरिकांशी सातत्याने संपर्क ठेवत त्यांनी तालुक्यात आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली. जिल्हा परिषदेच्या राजकारणातही त्यांनी सक्रिय भूमिका बजावली आहे.

काँग्रेसमधील जबाबदाऱ्या पार पाडल्यानंतर आता शिवसेनेत प्रवेश करत उपजिल्हाप्रमुखपदाची धुरा स्वीकारल्यामुळे मंठा तालुक्यातील राजकीय समीकरणांमध्ये नव्या घडामोडींना वेग आला आहे. मागील विधानसभेनंतर तालुक्यात मोठ्या प्रमाणात राजकीय फेरबदल होताना दिसत असून मोरे यांच्या नियुक्तीला त्याचाच एक भाग मानले जात आहे.

या निवडीमुळे शिवसेना (शिंदे गट)मध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. विविध स्तरांवरून मोरे यांचे अभिनंदन करण्यात येत असून आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ही नियुक्ती पक्षासाठी बळकटी देणारी ठरणार असल्याचे बोलले जात आहे.

वंदनीय हिंदुरुदय सम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे साहेब यांची शिकवण याचा आपण प्रचार आणि प्रसार कराल तसेच शिवसेना पक्ष वाढीसाठी आपण सर्वांना सोबत घेऊन कार्य कराल असा विश्वास ठेवत पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

नवीन जबाबदारीबद्दल प्रतिक्रिया देताना मोरे यांनी पक्ष नेतृत्वाचे आभार मानून संघटन वाढीसाठी आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी कटिबद्ध राहण्याचा निर्धार व्यक्त केला.

## ब्राईट स्टार इंग्लिश स्कूल, मंठा येथे 'आनंदनगरी'चा रौप्यमहोत्सवी उत्सव उत्साहात

डॉ. आशिष तिवारी/मंठा

ज्ञान, कर्तृत्व आणि व्यवहारिक शहाणपण यांचा सुंदर संगम घडविणाऱ्या मंठा येथील ब्राईट स्टार इंग्लिश स्कूल मध्ये दि. २६ फेब्रुवारी रोजी 'आनंदनगरी' उपक्रमाचा रौप्यमहोत्सवी सोहळा उत्साह, आनंद आणि सर्जनशीलतेच्या वातावरणात संपन्न झाला. सलग २५ वर्षांची परंपरा जपत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा ध्यास घेणाऱ्या या उपक्रमाने यंदा विशेष उंची गाठली.



कार्यक्रमाचे उद्घाटन शिवसेना तालुकाप्रमुख उदयसिंह बोराडे यांच्या हस्ते झाले. प्रमुख पाहुणे म्हणून योगेश अवचार व के. जी. राठोड (विस्तार अधिकारी, पंचायत समिती मंठा) उपस्थित होते. मार्गदर्शक म्हणून शिवाजीराव देशमुख (केंद्रप्रमुख, नूतन मंठा), पत्रकार रंजीत बोराडे, डॉ. अमर निर्वळ, डॉ. सचिन सरकटे, परमेश्वर गायकवाड, अंकुश निर्वळ, डॉ. आशिष तिवारी, भगवान गायकवाड, कैलास अवचार, थावरे भाऊ, सतिषराव निर्वळ व कैलाशराव निर्वळ यांची मान्यवर उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुभाषराव निर्वळ होते.

'आनंदनगरी'च्या निमित्ताने शाळेचा परिसर जणू रंगतदार बाजारपेठेत रूपांतरित झाला होता. विद्यार्थ्यांनी विविध खाद्यपदार्थांची आकर्षक दुकाने उभारून विक्री केली. कुठे चविष्ट पदार्थांचा सुगंध दरवळत होता, तर कुठे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वासपूर्ण संवाद ग्राहकांचे मन जिंकत होता. व्यवहारिक ज्ञान, आर्थिक नियोजन, पैशांचे व्यवस्थापन, नफा-तोट्याचा हिशेब आणि ग्राहकांशी प्रभावी संवाद यांचे धडे प्रत्यक्ष कृतीतून विद्यार्थ्यांनी आत्मसात केले. शिक्षण हे केवळ पुस्तकापुरते मर्यादित न राहता जीवनाशी जोडले गेले, हेच या उपक्रमाचे खरे यश ठरले.

मुख्याध्यापक वामन राठोड यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली शिक्षक अनंतराव बोराडे, दिलीप चव्हाण, भागवत काकडे, प्रशांत आचार्य, बाळासाहेब जीवणे, सदानंद गडधे तसेच शिक्षिका वंदना दराडे, दिव्या चव्हाण, मयुरी गोरे, दिपज्योती डवरे, निकिता खरात, कल्पना प्रधान, विनल महाजन आणि जयश्री चव्हाण यांनी परिश्रमपूर्वक नियोजन करून कार्यक्रम यशस्वी केला. शाळेचे इतर कर्मचारीही या सोहळ्यात सक्रिय सहभागी झाले.

कार्यक्रमाचे ओघवते आणि प्रभावी सूत्रसंचालन भागवत काकडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन दिलीप चव्हाण यांनी मानले.'आनंदनगरी' हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाचा भक्कम पाया ठरत असून, शिक्षणासोबत जीवनकौशल्यांची जोड देणारी ही परंपरा भविष्यातही अधिक जोमाने फुलत राहील, असा विश्वास यावेळी उपस्थितांनी व्यक्त केला.

## राष्ट्रीय शिष्यवृत्ती परीक्षेत घनसावंगीच्या कै. दत्तासाहेब देशमुख विद्यालयाची दैदिप्यमान कामगिरी!

४६ पैकी तब्बल १६ विद्यार्थी उत्तीर्ण; गुणवत्तेचा झेंडा पुन्हा एकदा उंचावला

घनसावंगी ।प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद आयोजित राष्ट्रीय शिष्यवृत्ती परीक्षा दि. २८ डिसेंबर २०२५ रोजी पार पडली होती. नुकताच जाहीर झालेल्या अंतिम निकालात घनसावंगी येथील कै. दत्तासाहेब देशमुख माध्यमिक विद्यालयाने उल्लेखनीय यश संपादन करत ४६ विद्यार्थ्यांपैकी तब्बल १६ विद्यार्थी उत्तीर्ण करून शैक्षणिक गुणवत्ता पुन्हा अधोरेखित केली आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक परीक्षांमध्ये यश मिळवून देण्याच्या ध्येयाने कार्यरत असलेल्या विद्यालयाने सातत्यपूर्ण मार्गदर्शन, सराव चाचण्या आणि वैयक्तिक लक्ष या माध्यमातून ही दमदार कामगिरी साध्य केली आहे.

मार्गदर्शनाची भक्कम साथ

या यशामागे मुख्याध्यापक केशव अटकर, परीक्षा विभाग प्रमुख श्री. जे. बी. जाधव, सय्यद एम. एम., तसेच सहशिक्षक श्री. संतोष घायाळ, श्री. गोविंद भुतेकर, श्री. विठ्ठल सोमवारे, श्री. शिंदे एस. बी., श्री. जगन्नाथ जाधव, श्री. एम. एम. सय्यद आणि श्रीमती शामल कांगणे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल राजेश भैय्या टोपे (अध्यक्ष, मत्स्योदरी शिक्षण संस्था), सचिव मनिषाताई टोपे, प्रशासकीय अधिकारी डॉ. बी.



आर. गायकवाड, सहाय्यक प्रशासकीय अधिकारी तथा प्राचार्य श्री. राहुलजी भालेकर, तसेच मुख्याध्यापक केशव अटकर व सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

ग्रामीण भागातील शाळेतून राष्ट्रीय स्तरावरील शिष्यवृत्ती परीक्षेत मिळवलेले हे यश निश्चितच इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरणारे आहे. कै. दत्तासाहेब देशमुख माध्यमिक विद्यालयाने गुणवत्ता, परिश्रम आणि सातत्य यांचा संगम साधत शिक्षण क्षेत्रात आपला वेगळा ठसा उमटवला आहे.

## रेणुका विद्यालयात जैव विविधता संबंधी विद्यार्थ्यांचे प्रबोधन

सामाजिक वनीकरण विभागाचा उपक्रम

मंठा ।प्रतिनिधी

जैव विविधतेमुळेच आपल्याला शुद्ध हवा, शुद्ध पाणी, अन्न, औषधी, इंधन यासारखी नैसर्गिक संसाधने उपलब्ध होतात. जैव विविधतेमुळेच पर्यावरणाचे संतुलन अबाधित राहते असे प्रतिपादन प्रा.प्रदीप देशमुख यांनी जैव विविधता या विषयावर व्याख्यान देताना केले.

येथील रेणुका विद्यालय आणि सामाजिक वनीकरण वनपरिक्षेत्र मंठा यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतेच विद्यार्थ्यांच्या प्रबोधनासाठी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्राचार्य.डी.एस.बुलबुले , वनपाल तथा सहाय्यक लागवड अधिकारी पी.एम.महाजन, वनरक्षक एम.डी.चव्हाण, एन. बी.सोनटक्के, उपप्राचार्य आर. के.राठोड, पर्यवेक्षक अशोक चव्हाण, वनरक्षक एस.बी. चव्हाण यांची प्रमुख




उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली. याप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रा.प्रदीप देशमुख पुढे म्हणाले की, माणसाच्या हस्तक्षेपामुळेच जैव विविधतेला धोका निर्माण होत आहे. मोठ्या प्रमाणात होणारी जंगलतोड, वाढते शहरीकरण, वाढती कारखानदारी, रासायनिक खतांचा वाढता वापर, यातून जैव विविधतेला हानी पोहोचत असून पर्यावरणाचे संतुलन बिघडत चालले आहे. जैवविविधतेच्या ऱ्हासामुळे हवामानात मोठे बदल होत असून पावसाचे प्रमाण घटत चालले आहे. तापमानात दिवसेंदिवस वाढ होत असून अनेक प्रजाती नामशेष होत चालल्या आहेत. प्राणीजन्य रोगांची शक्यता वाढली आहे. भविष्यातील धोके ओळखून अभयारण्याची निर्मिती करणे, वृक्षारोपण, वन्यजीवांचे संरक्षण, पर्यावरण विषयक जनजागृती यासारखे उपक्रम हाती घ्यावे लागतील असे प्रा.देशमुख यांनी शेवटी सांगितले. अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य.डी.एस.बुलबुले यांनी सांगितले की, जंगल तोड होत असल्यामुळे प्राणी आणि पक्षांचे अधिवास मोठया प्रमाणावर नष्ट होत आहेत. यामुळेच अनेकदा जंगलात राहणारे प्राणी मानवी वस्त्यांत शिरत असल्याच्या घटना वारंवार घडत आहेत. प्रास्ताविक उपप्राचार्य आर.के.राठोड यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अशोक गायकवाड यांनी केले तर श्रीमती एस.पी.राठोड यांनी आभार मानले.

## श्रद्धेची कोवळी पाखरे ९ वर्षीय मोईन आणि ७ वर्षीय राहीलचा पहिला रोजा पूर्ण



अंबड ।प्रतिनिधी

रमजानच्या पवित्र महिन्यात उपवास, संयम आणि श्रद्धेची परंपरा जपत अंबड शहरातील मंजूर बागवान यांचे ९ वर्षीय मोईन आणि ७ वर्षीय राहील या दोन चिमुकल्यांनी आपल्या आयुष्यातील पहिला रोजा यशस्वीरीत्या पूर्ण करून सर्वांचे मन जिंकले आहे.

कडक उन्हाच्या झळा अंगावर घेत दिवसभर पाण्याचा एकही थेंब किंवा अन्नाचा कण न घेता या दोन्ही बालहृदयांनी अल्लाहवरील अढळ विश्वास आणि निष्ठा जपत रोजा पूर्ण केला. एवढ्या लहान वयातही अल्लाह तालाह आपल्याकडे पाहतो आहे ही भावना मनात ठेवून त्यांनी संयम, शिस्त आणि श्रद्धेचा सुंदर आदर्श घालून दिला.

घरातील वातावरणही भावनिक झाले होते. सायंकाळी अजान होताच इफ्तारच्या वेळी मोईन आणि राहीलच्या चेहऱ्यावर उमटलेले समाधान आणि आनंदाचे हास्य पाहून कुटुंबियांच्या डोळ्यात आनंदाश्रू तरळले. त्यांच्या या निर्धाराचे आणि भक्तीभावाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

रोजा म्हणजे केवळ उपवास नव्हे तर आत्मशुद्धी, संयम आणि परमेश्वरावरील निस्सीम श्रद्धेचा प्रवास. या दोन्ही चिमुकल्यांनी तो प्रवास पहिल्याच प्रयत्नात यशस्वीपणे पूर्ण करून समाजासमोर प्रेरणादायी उदाहरण ठेवले आहे. अल्लाह तालाह त्यांच्या या निष्पाप इबादतीला कबूल करो आणि त्यांच्या आयुष्यात सदैव सुख शांती व यश नांदो अशीच सर्वांची मनापासून प्रार्थना आहे.

# जिल्हाधिकाऱ्यांच्या समान संधीच्या तत्वाला हरताळ फासणाऱ्या निर्णयाविरोधात मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, महसूल मंत्र्यांकडे तक्रार

बीड ।प्रतिनिधी

पोलिस पाटील भरती प्रक्रियेदरम्यान समान संधीच्या तत्वाला हरताळ फासत बीड जिल्हा प्रशासनाने घेतलेल्या निर्णयाविरोधात सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी राज्याच्या वरिष्ठ पातळीवर लेखी तक्रार दाखल केली आहे.काय आहे वादग्रस्त निर्णय ?पोलिस पाटील पदासाठी शैक्षणिक पात्रता १० वी उत्तीर्ण अशी असताना, २० गुणांच्या मुलाखतीत अधिक शिक्षणाला अतिरिक्त गुण देण्याचा निर्णय बीड जिल्हाधिकाऱ्यांनी जाहीर केला आहे.

नवीन गुणांकन पद्धतीनुसार: १० वी उत्तीर्ण - ५ गुण १२ वी - अतिरिक्त ३ गुण पदवी - अतिरिक्त ३ गुण पोलिस पाटील वारस / माजी सैनिक / गृहरक्षक दल - अतिरिक्त गुण सामान्य ज्ञान (मुलाखतीत) - केवळ ३ गुण यामुळे केवळ १० वी उत्तीर्ण उमेदवारांना प्रत्यक्ष मुलाखतीत स्पर्धात्मक संधी मर्यादित होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

समान संधी तत्वाचा भंग

डॉ. ढवळे यांनी नमूद केले की, ज्या पदासाठी जी शैक्षणिक पात्रता निश्चित आहे, त्याच निकषावर मूल्यांकन होणे अपेक्षित असते. अधिक शिक्षण असलेल्या उमेदवारांना स्वतंत्र अतिरिक्त गुण देणे म्हणजे १० वी उत्तीर्ण उमेदवारांवर अन्याय होय.लोकसेवा आयोगाच्या परीक्षांमध्ये देखील अधिक शैक्षणिक पात्रतेसाठी वेगळे गुण देण्याची पद्धत नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

शासन निर्णयाचा चुकीचा अर्थ ?

शासन निर्णयानुसार, दोन उमेदवारांना लेखी व तोंडी परीक्षेत समान गुण मिळाल्यास प्राधान्यक्रमासाठी अधिक शिक्षण, पोलिस पाटील वारस,गृहरक्षक दल सदस्य,माजी सैनिक असा क्रम दिला आहे. मात्र हा प्राधान्यक्रम गुणांकनासाठी नव्हे, तर टाय-ब्रेक परिस्थितीसाठी असल्याचे डॉ. ढवळे यांनी नमूद केले.त्यामुळे बीड जिल्हा प्रशासनाने शासन निर्णयाचा चुकीचा अर्थ लावून मुलाखतीतील गुणांकनात



बदल केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

# रमण वर्णपट हा जगाचे चित्र बदलणारा एक मोठा शोध आहे

धर्माबाद अशोक पडोळे

शहरातील हुतात्मा पानसरे हायस्कूल धर्माबाद येथे राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक सन्मुख बेंबरेकर,सौ. ज्योती पडगिलवार, नरेश जिंदामवार, हे होते. यावेळी विज्ञान दिवसाच्या अवचित साधून सौ.सारिका हेमके रमण वर्णपट हा जगाचे चित्र बदलणारा एक मोठा शोध आहे. त्या शोधाचा सन्मान देण्यासाठी दरवर्षी २८ फेब्रुवारी राष्ट्रीय विज्ञान दिवस साजरा केला जातो.राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त आपण सगळे विज्ञान मंचावर विज्ञानावरच्या शंका,प्रश्न, प्रयोग करून तपासून पाहू पुढे येऊन प्रगती करून तसे केले तर नवे काही सापडेल भारतात एकच सी व्ही रमण नको तर अनेक हवे आहेत. विज्ञानामुळे मानवाने अवकाशात गेला विज्ञानाच्या प्रगतीमुळे अनेक उच्चांक सह केले. असे सो सारिका हेमके यांनी मनोगत व्यक्त करताना म्हणाल्या. यावेळी विज्ञान प्रमुख शिक्षक शंकराव सोनटक्के,शोभा देशपांडे,सौ मायावती कसाब, अंतरिक्ष गायकवाड,ह्या शिक्षकांनी विज्ञान विषयावर मनोगत व्यक्त केले. तर शाळेतील विद्यार्थिनी शुभांगी डिगोळे, श्वेता चिवटे, मधुमती गलांडे श्रद्धा येवतीवाड, मनीषा महादनवाड साक्षी गुरलोड, समर्थ देशमुख यांनी मनोगत व्यक्त केले. शाळेच्या प्रथे .प्रमाणे हुतात्मा गोविंदराव पानसरे यांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करण्यात येऊन सी व्ही रमण यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नंदिनी शिंदे यांनी केले. यावेळी विज्ञान डिपार्टमेंट लक्ष्मण एडके कु. ऋतुजा सलगर व शाळेतील सर्व शिक्षक शिक्षक येथे कर्मचारी उपस्थित होते.

# लातूर येथे सनदी लेखापाल, प्रमाणित लेखा परीक्षक सहकारी संस्था प्रशिक्षणास उत्तम पतीसाद

लातूर (प्रतिनिधी)

महाराष्ट्र राज्य सहकारी संघ म पुणे चे सहकारी शिक्षण प्रशिक्षण कार्यक्रमांगत सहकार प्रशिक्षण केंद्र लातूर मा. विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था लातूर यांचे वतीने लातूर येथे जिल्ह्यातील सहकार विभागाचे पॅनेलवरील सनदी लेखापाल, प्रमाणित लेखा परीक्षक यांचे करीता दोन दिवसीय प्रशिक्षण वर्ग घेण्यात आले.

कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हा विशेष लेखा परीक्षक एस. पी. चव्हाण साहेब यांचे हस्ते श्री स्वामी समर्थ यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आले. दोनदिवसीय प्रशिक्षण वर्गात पी. बी. पाटील उप लेखा परीक्षक सहकारी संस्था औसा , निवृत जिल्हा विशेष लेखा परीक्षा एस. बी. कोमटे, सनदी लेखा परीक्षक द्वारकादासजी भुतडा, अमोल मुळे, उप लेखा परीक्षक रमाकांत सलगरे महात्मा बसवेश्वर महाविद्यालय लातूरचे डॉ. संजय गवई यांनी विविध विषयांवर माहिती मार्गदर्शन




केले.

समारोप प्रसंगी डॉ. संजय गवई सर व महाराष्ट्र राज्य सहकारी संघ म पुणे चे मुख्याधिकारी मेघराज सरवदे यांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सूत्र संचलन आभार प्रदर्शन वर्ग संयोजक एस. आर. कोळे उपप्राचार्य सहकार प्रशिक्षण केंद्र लातूर यांनी केले.

# श्याम विद्यालय दहिफळ वडमाऊली येथे श्रीमती इंदुमती ठोंबरे यांचा सेवापुर्ती निमित्ताने सत्कार समारंभ संपन्न

बीड ।प्रतिनिधी

केज तालुक्यातील दहिफळ वड माऊली येथील श्याम विद्यालयाच्या सहशिक्षिका ठोंबरे इंदुमती दादाहरी यांचा सेवापुर्ती निमित्ताने पतीसह श्याम कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्या सौ. जयश्री शरद गदळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात प्रथम संस्थेचे संस्थापक श्याम दादा व त्यांच्या धर्मपत्नी बाळू ताई गदळे यांच्या प्रतिमेचं पूजन करून झाली प्रथम उपस्थितांचा शाळा महाविद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला याप्रसंगी सत्कारला उत्तर देत असताना श्रीमती आयडी ठोंबरे यांनी आपल्या शैक्षणिक जीवनावर सेवेच्या कार्यकाळावर प्रकाश टाकला त्यानंतर डॉक्टर मुंडे सर यांनी त्यांचे वैवाहिक जीवन व आलेले अनुभव सविस्तरपणे प्रकट केले यानंतर आपल्या अध्यक्षीय समारोपामध्ये बोलत असताना प्राचार्या जयश्री गदळे म्हणाल्या की महिलांचे दुःख




महिलांनाच माहीत असते म्हणून मी दुःखाच्या प्रसंगी ठोंबरे मॅडम यांना धीर देण्याचे आधार देण्याचे काम केले आज त्या सेवेतून दूर जात आहेत याचं मला दुःख होत आहे यावेळी श्री ठोंबरे दत्ता सर, श्रीमती कुलकर्णी मॅडम, बी एस मुंडे सर, भोसले सर, धस सर यांनी शुभेच्छा पर मनोगत व्यक्त केले याप्रसंगी उपप्राचार्य राजेश गंदगे, ज्येष्ठ शिक्षक ठोंबरे बीबी, प्राध्यापक गपाट एमटी, महादेव ठोंबरे ग्रामपंचायत सदस्य, सिद्धेश्वर ठोंबरे ग्रामपंचायत सदस्य , नितीन ठोंबरे, अमोल ठोंबरे, सत्कारमूर्तीचे कुटुंबीय व नातेवाईक तसेच शाम विद्यालय श्याम कनिष्ठ महाविद्यालय व शाम गदळे कला विज्ञान वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डोईफोडे टी एस यांनी केले तर आभार सुनील मोरे यांनी मानले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम केले अशी माहिती प्रसार माध्यमांना मा. सरपंच प्राध्यापक तात्यासाहेब डोईफोडे यांनी दिली आहे.

# अंबड तालुक्यात महसूल विभागाचा वाळू माफियांवर मोठा घाव

## दोन ट्रॅक्टर जप्त गुन्हे दाखल अवैध उत्खनन खपवून घेतले जाणार नाही- तहसीलदार विजय चव्हाण

अंबड ।प्रतिनिधी

अंबड तालुक्यात अवैध वाळू उत्खनन व वाहतूक करणाऱ्यांविरोधात महसूल विभागाने अखेर कठोर भूमिका घेत धडक मोहीम उघडली आहे. जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल यांच्या मार्गदर्शनाखाली तहसीलदार विजय चव्हाण यांच्या नेतृत्वाखालील पथकाने अंबड व गोंदी पोलीस ठाण्यांच्या हद्दीत दोन स्वतंत्र कारवाया करत अवैध वाळू वाहतूक करणारे दोन ट्रॅक्टर जप्त केले. या कारवाईमुळे वाळू माफियांमध्ये एकच खळबळ उडाली आहे दुधना नदीपात्रातून थेट पकड

मौजे मठ पिंपळगाव येथील दुधना नदी पात्रात अवैध वाळू उपसा सुरू असल्याची गुप्त माहिती मिळताच महसूल पथकाने सापळा रचला. लालवाडी फाटा येथे पाळत ठेवून वाळूने भरलेला एक ट्रॅक्टर रंगेहात पकडण्यात आला. धक्कादायक बाब म्हणजे सदर ट्रॅक्टरवर कोणताही नोंदणी क्रमांक नव्हता! चालकाकडे वैध ई-चलन किंवा पावती नव्हती. नंतर सादर केलेली पावतीही तपासणीत बनावट असल्याचे उघड झाले. वाहनात जीपीएस यंत्रणा देखील नव्हती.

या कारवाईत स्वराज ७४४दढ मॉडेलचा केशरी रंगाचा ट्रॅक्टर चेसिस क्र. चइछ्इण५३-उ्छउक२७८४२ आणि सुमारे १ ब्रास वाळूसह एकूण ७ लाख



५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.तलाठी स्वप्नील खरात यांच्या फिर्यादीवरून चालक रईस सय्यद व मालक अमोल शिवनाथ जिगे दोघे रा.मठ पिंपळगाव यांच्यावर बीएनएस २०२३, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, खाण अधिनियम व पर्यावरण संरक्षण अधिनियमांतर्गत गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.कुख्यात आरोपीचा ट्रॅक्टर पुन्हा जप्त!

गोंदी पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका प्रकरणात न्यायालयाने वाहन सोडण्याचे आदेश दिले असले तरी महसूल विभागाचा दंड भरलेला नव्हता. त्यामुळे मंडळ अधिकारी कृष्णा हेडके व त्यांच्या पथकाने संबंधित ट्रॅक्टर पुन्हा जप्त करून तहसील कार्यालयात आणला.

हा ट्रॅक्टर कुख्यात गुंड विलास शिंदे उर्फ 'वकिल्या' याच्या मालकीचा असल्याचे समोर आले आहे. वाहन जप्त करताना काही महिलांकडून अडथळा आणण्याचा प्रयत्न झाला मात्र एपीआय आशिष खांडेकर यांच्या पोलीस पथकाने तत्काळ धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली.

तहसीलदारांचा स्पष्ट इशारा

कोणत्याही परिस्थितीत अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूक सहन केली जाणार नाही.दोषींवर दंडात्मकच नव्हे तर फौजदारी कारवाईही केली जाईल.अवैध वाळू वाहतूक करणाऱ्यांना गय केली जाणार नाही असा कडक इशारा तहसीलदार विजय चव्हाण यांनी दिला.प्रतिबंधात्मक कारवाईसाठी पोलीस ठाण्यांना अधिकृत पत्रव्यवहार करण्यात आल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. संयुक्त कारवाईमुळे माफियांचे धाबे दणाणले या दोन्ही धाडसी कारवायांमध्ये मंडळ अधिकारी सुनील कारामपुरी,कृष्णा हेडके, तलाठी स्वप्नील खरात, विश्वास ढवळे, श्याम विभूते, विकास डोळसे, गाडेकर, कोतवाल मनोज उघडे, पोलीस पाटील महेंद्र भिंगारदेव तसेच महसूल व पोलीस विभागातील अधिकारी-कर्मचारी यांनी मोलाची भूमिका बजावली. अंबड तालुक्यात अवैध वाळू माफियांवर महसूल विभागाने उगारलेला हा कायदेशीर कोरडा आगामी काळात आणखी कठोर कारवायांची नांदी ठरणार का याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# जिजाऊ ज्ञानमंदिरात मराठी भाषागौरव व विज्ञान दिन साजरा

मुखेड (प्रतिनिधी)

जिजाऊ ज्ञानमंदिरात २८ फेब्रुवारी शनिवारी दुपारी एक वाजता कविश्रेष्ठ कुसुमाग्रज यांची जयंती अर्थात मायबोली मराठी भाषागौरव दिन व थोर वैज्ञानिक सी.व्ही. रमन यांचा जन्मदिन विज्ञान दिन म्हणून विविध उपक्रमांसह उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यस्थानी संचालक ज्ञानोबा जोगदंड सर तर मुख्याध्यापक जगदीप जोगदंड सर , पर्यवेक्षक सुधाकर जोगदंड सर मराठीभाषा विभागप्रमुख प्रा. प्रकाश भद्रे , सायन्स विभाग प्रमुख प्रा. नागनाथ कांबळे , अनिता शिंदे मॅडम आदीं प्रमुख उपस्थित होते.

प्रारंभी कविश्रेष्ठ कुसुमाग्रज व वैज्ञानिक सी.व्ही. रमन यांच्या प्रतिमेचे पुजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. सचिन सुर्यवंशी , विनिता चव्हाण ,रेवा गायकवाड , सांची धनवाडे आणि संचाने स्वागतगीत गाऊन मान्यवरांचे स्वागत केले. दरम्यान दरवर्षी प्रमाणे याही वर्षी चौथ्या मराठी भाषा गौरवांक २०२६ चे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. या अंकात रेवा गायकवाड - ' हे राज्य माझे हे ' ,कु. सांची धनवाडे - शाळा ,कु. प्रियंका गुट्टे - माझे जीवन ,




कु. अनुजा जाधव - मौल्यवान जीवन , कवी प्रा. प्रकाश भद्रे - शिवाई , कवयित्री परवीन शेख - आई ' अनिल यमेकर - कर्तव्यरथ , सुधाकर जोगदंड - माय मराठी , मेनका जाधव - आई , शकुंतला गीते - शिकावं शाळा या विविध विषयावर कवी व कवयित्रींनी आपल्या कविता सादर केल्या तर संचालक ज्ञानोबा जोगदंड यांची 'माझी मराठी 'आणि संपादकीय - मायबोली मराठी जय हो ! आदी विविध विषयावर सुंदर कवितां सह सजलेला जिजाऊ ज्ञानमंदिर शाळेचा मराठी भाषा गौरवांक डिजीटल सचित्र स्वरुपात साकारला आहे. या अंकाचे प्रकाशन आणि काव्यवाचन कार्यक्रमाचा अनुभव प्रत्यक्ष सहभागी कवींनी घेतला. याच दरम्यान विज्ञानदिनाचे औचित्य साधून शालेय विद्यार्थ्यांनी साकारलेले विज्ञानाचे विविध प्रयोग वर्गनिहाय प्रात्यक्षिक स्पष्टीकरणासह या कार्यक्रमातून सादर करण्यात आले. सहशिक्षक अमोल राठोड यांनी ' हंबरून वासरांना चाटते जवा गाय ' ही कविता गाऊन सर्वांच्या टाळ्या मिळवल्या. मराठी भाषा गौरव दिन कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सुत्रसंचलन प्रा. भद्रे सर यांनी केले. तर विज्ञान दिन कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचलन परवीन शेख मॅडम यांनी केले. शिक्षक वक्त्यांपैकी पर्यवेक्षक सुधाकर जोगदंड सर , परविन शेख मॅडम , व अध्यक्षिय भाषणातून ज्ञानोबा जोगदंड सर यांनी विचार मांडले.. कार्यक्रमाचे फोटोशेषण सचिन सुर्यवंशी सर व संजय चौडेकर यांनी केले.

# होळी म्हणजे ग्रामशुद्धी, मन शुद्धी

होळीचा सण येत आहे .त्या पाठोपाठ धुळवड, म्हणजे मजाच मजा,असा आपला समज झालेला आहे. सनी आनंदासाठीच असतात ही खरी असली तरी गेल्या काही दशकात आपण सणाचा पार विचका करून टाकला आहे.होळी पेटवून अस्वच्छतेचा नाश करावयाचा असतो, पण गेल्या काही वर्षात या सणाचे स्वरूप बदलत चालले आहे. खरे म्हणजे असेच आतापर्यंत सगळे जण सांगत आले आहेत, आता आम्हि पण तेच सांगत आहोत व भविष्यातील सगळे जण असेच सांगणार आहेत. दुसऱ्या सांगे ज्ञान, आपण कोरडे पाषाण या उक्तीप्रमाणे प्रत्येक जण दुसऱ्याला ज्ञानाचा डोस पाजत असतो, मात्र होळीची धुळवड आली की दारूत भिजवून डोसा खात असतो. प्रत्येक सणामागे काही चांगले असे उद्देश असतात पण आपण या उद्देशानाच विसरून जातो किंवा सोयीनुसार अर्थ काढून सणाच्या मुळ उद्देशास हरताळ फासतो.

सकत धर्मामाजी सणवार । याचिसाठी केले सान थोर ।

जेणे मनुष्याची कदर ।
मनुष्य करील सर्वदा ।।

माणसाने माणसाची कदर करावी, माणूसपण जागवावे यासाठी सणवार असतात. पण घुलीच्या निमीताने आपण जे प्रकार सध्या करीत आहोत त्यामुळे माणूसकिला काळिमा लागत आहे. होळीत आपल्या मनातील वाईट विचार जाळावयाचे असतात पण आपण वाईट विचारानाच या निमीताने थारा देत असतो. ज्या गोष्टी करायला नको त्याच गोष्टी आपण करतो.होळीच्या निमीत्ताने मोठ्या प्रमाणात वृक्षाची कतल करून पर्यावरणाचा -हास करीत




आहोत. होळीच्या निमीत्ताने शेजारच्या घरातील चांगले लाकडी सामानही चोरून नेण्याची लाज आपणास वाटत नाही. होळीच्या निमीताने खरे म्हणजे गल्लीतील,गावातील कचरा जाळायला हवा, पण त्याचा तर आपण धुळवडीला उपयोग करून माणूसकीच्या तोंडाला पाने पुसत असतो.

राष्ट्रसंत म्हणतात-

त्याच दिवसी सज्जनानी ।
वार्षिक यज्ञाची केली आखणी ।
सम्पूर्ण गाव साफ करोनि ।
द्यावे पेटवोनि केंचण ते ।
त्याच्या प्रकाशी सर्वानि जमावे ।
आपले दुष्कृत निवेदावे श्र
पुढे तैसे न करण्याचे योजावे । अनुतापाने ।।

गावातील कचरा होळीत जाळून गाव स्वच्छ करावयाचे तसेच या पेटवलेल्या होळीच्या प्रकाशात आपल्या मनातील वाईट विचारांना जाळून टाकण्याचा, पश्चातापाने पुन्हा असे न करण्याचा हा सण. प्रल्हाद म्हणजे चांगल्या विचाराचे, प्रतिक तर होळीका म्हणजे वाईट विचाराचे प्रतिक. शंकराने होळीच्या दिवशीच तिसऱ्या नेत्राने काम (म्हणजे वासनेला) जाळून टाकले तसेच आपण आपल्या डोक्यातील वाईट विचार आज जाळायला हवे.

होळी आणि धुळवड सणाच्या निमीत्ताने आपण जे जे काय अमंगल, रुढी परंपरेच्या नावाखाली करीत आहोत त्यामुळे पर्यावरणाला मोठा धोका निर्माण होत आहे. हे सगळे कळत असुनही आपणास सण आला की वळत नाही, ही खरी आजची शोकांतिका आहे. पर्यावरणाचा समतोल ढासळत चालला आहे, त्याचे दुष्परीणाम आपल्या आरोग्यावर तर होतच आहेत पण त्यामुळे आपण भावी पिढीला धोक्याच्या गर्तेत ढकलत आहोत, याचा देखील आपणास विसर पडत चालला आहे. वेळीच आपण सावध झाले नाही तर भावी पिढी आपणास अजिबात माफ करणार नाही. एवढे मात्र खरे.

**गुलाब भावसार बीड.**
**९४२३७१५९८२**

# भविष्यात मोठे अधिकारी व्हायचे असेल तर विद्यार्थीनीं स्पर्धा परिक्षेत सहभागी व्हावे, गटशिक्षणाधिकारी सुधीर गुट्टे

नांदेड :-भविष्यात मोठे अधिकारी व्हायचे असेल तर विद्यार्थीनी आतापासूनच स्पर्धा परिक्षेत सहभागी होऊन भाग घ्यायला हवे असे आवाहन गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती नांदेडचे सुधीर गुट्टे यांनी जिल्हा परिषद हायस्कूल विष्णुपुरी येथे आयोजित एन.एन.एम.एस.परिक्षेत उत्तीर्ण विध्यार्थी सत्कार सोहळा प्रसंगी केले.

जिल्हा परिषद हायस्कूल येथे दि २८ फेब्रुवारी रोजी,भारतात दरवर्षी दि २८ फेब्रुवारी रोजी राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा केला जातो २८ फेब्रुवारी १९२८ रोजी भारतीय भौतिक शास्त्रज्ञ प्रो.सी.व्ही.रमन यांनी रमन इफेक्ट या शोधाची घोषणा केली होती. यासाठी त्यांना १९३० मध्ये भारतात पहिले नोबल पारितोषिक मिळाले. वैज्ञानिक जागरूकता वाढवण्यासाठी आणि विज्ञानाचे महत्त्व सांगण्या साठी, हा दिवस साजरा केला जातो.

पीएमश्री जिल्हा परिषद हायस्कूल विष्णुपुरी या शाळेसाठी या वर्षीच्या विज्ञान दिन विशेष होता. शाळेतील इयत्ता आठवीच्या ५७ पैकी ४५ विद्यार्थ्यांनी एन. एन.एम.एस म्हणजेच (राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक परीक्षा ) या परीक्षेत घवघवीत यश मिळून शाळेच्या आणि गावाचं नाव लौकिक केल्या बद्दल विज्ञान दिनाचे औचित्य साधून सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.




या सोहळयाला सुधीर गुट्टे गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती नांदेड यांची विशेष उपस्थिती होती, यावेळी शालेय जीवनातील शिष्यवृत्ती परीक्षा आणि एन.एन.एम.एस सारख्या परीक्षा म्हणजे यु.पी.एस.सी आणि एम.पी.एस.सी परीक्षांच्या पाया आहे. जर भविष्यात मोठे अधिकारी व्हायचे असेल तर विद्यार्थ्यांनी आतापासूनच अशा प्रकारच्या स्पर्धा परीक्षां मध्ये भाग घ्यायलाच पाहिजे असा संदेश शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना देऊन परीक्षेत उत्तीर्ण सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. या कार्यक्रमाला काळेश्वर संस्थानचे सचिव शंकर हंबर्डे,सरपंच सौ.संध्याताई विलास हंबर्डे, पालक प्रतिनिधी,शालेय व्यवस्थापन समिती सदस्य राजेश बालाजी हंबर्डे,भास्कर हंबर्डे,शिलानंद सोनकांबळे, गावातील प्रतिष्ठित नागरिक व शिक्षण विस्तार अधिकारी बालासाहेब कच्छवे,केंद्रप्रमुख विकास मोरे,विषय तज्ञ मारुती ढगे , सामाजिक कार्यकर्ते भास्कर हंबर्डे, पत्रकार रमेश ठाकूर,यांची विशेष उपस्थिती होती. अध्यक्षीय समारोप विष्णुपुरी गावातील तंटामुक्तीचे अध्यक्ष तथा सेवानिवृत्त उपनिरीक्षक माणिक हंबर्डे यांनी परीक्षेत उत्तीर्ण सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक करून या सर्व विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक परीक्षेसाठी तयार करणारे शाळेतील शिक्षक संतोष देशमुख,आनंद वळगे,विकास दिग्रसकर,धनंजय न्यामलवार,व सहभागी सर्व शिक्षकांचे अभिनंदन करून त्यांचे कौतुक केले.

यावेळी सामाजिक कार्यकर्ते भास्कर हंबर्डे यांच्या कडून शाळेतुन प्रथम आलेली विद्यार्थी साक्षी शंकर हंबर्डे, व्दितीय भक्ती नागोराव पांचाळ,तृतीय सम्यक उत्तम लोकडे यांना पदक देऊन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले तर जिल्हा परिषद शाळेच्या वतीने पेन पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेतील शिक्षिका अनुजा पवार यांनी केले,तर आभार प्रदर्शन मुख्याध्यापिका उज्वलाताई जाधव यांनी केले.




## किनवटमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा फुले संयुक्त जयंती २०२६

### दोन्ही समित्यांच्या कार्यकारिणीची घोषणा

किनवट ।प्रतिनिधी

किनवट शहरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा ज्योतिराव फुले यांच्या जयंतीनिमित्त संयुक्त जयंती महोत्सव २०२६ चे आयोजन करण्यात आले आहे. या संदर्भात दोन समित्यांनी आपापल्या कार्यकारिणी जाहीर केल्या आहेत.

रमामाता प्रतिष्ठानची कार्यकारिणी :* रमामाता प्रतिष्ठानच्या वतीने दि. ११ ते १४ एप्रिल २०२६ दरम्यान जयंती महोत्सव साजरा करण्यात येणार आहे. अध्यक्ष – आकाश वि. आळणे, उपाध्यक्ष – रवी सूर्यवंशी, सचिव – प्रतिकेश दि. ओंकार, कोषाध्यक्ष – निखिल ओंकार, सहकोषाध्यक्ष – कपिल बलखंडे महोत्सवाच्या काळात सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती समिती, किनवट

किनवट शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती समितीची ही कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे. ज्यामध्ये अध्यक्ष – निखिल सर्पे, उपाध्यक्ष – आकाश सर्पे, अनिकेत भरणे, सचिव – सिद्धार्थ भरणे, आल्फ्रेड ठमके, कोषाध्यक्ष – संघर्ष घुले, सहकोषाध्यक्ष – अनिल कांबळे यांची निवड करण्यात आली आहे. या समितीच्या वतीनेही जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. नागरिकांनी कार्यक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन दोन्ही समित्यांनी केले आहे.



## आंतरराष्ट्रीय परिषद चा समारोप उत्साहात

नांदेड ।प्रतिनिधी

जैवशास्त्रातील नवोन्मेष व उपयोजन या विषयावर आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदचा समारोप दि. २७ फेब्रुवारी २०२६ रोजी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठामधील जैवशास्त्र संकुल येथे उत्साहात पार पडला. ही परिषद नॅशनल केमिकल लॅबोरेटरी, पुणे आणि पीएम – उषा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली होती.

समारोप समारंभात मा. प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांच्या हस्ते कार्यक्रम पार पडला. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. अशोक गिरी उपस्थित होते. पल्या अध्यक्षीय भाषणात डॉ. महाजन यांनी वाहकजन्य रोग आणि वाढती प्रतिजैविक प्रतिकारक्षमता ही जागतिक पातळीवरील गंभीर आव्हाने असल्याचे नमूद केले. या समस्यांवर प्रभावी उपाययोजना करण्यासाठी बहुविद्याशाखीय व आंतरविद्याशाखीय संशोधनाची आवश्यकता असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. समाजाभिमुख आणि लोककल्याणकारी संशोधनाला प्राधान्य देण्याचे आवाहनही त्यांनी केले.परिषदेमध्ये देश-विदेशातील तज्ज्ञांनी सहभाग नोंदवून जैवशास्त्रातील नवकल्पना, संशोधनाची दिशा आणि उपयोजन यावर सखोल चर्चा केली. विद्यार्थी-शिक्षक आदानप्रदान कार्यक्रमांमुळे आंतरराष्ट्रीय शैक्षणिक सहकार्य अधिक बळकट होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. या परिषदेस प्रा. तिरफाप सी. कॅसेट डॉजीराम (बँकॉक, थायलंड), डॉ. हाडजी नियांग (सेनेगल, आफ्रिका), डॉ. बी. एस. सुरवसे, डॉ. एस. के. घोष, डॉ. टी. ए. कदम, डॉ. एस. पी. चव्हाण यांसह विविध मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. रुबिया शेख यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. एल. एच. कांबळे यांनी केले. परिषद यशस्वी करण्यासाठी जैवशास्त्र संकुलाचे संचालक, प्राध्यापक, संशोधक विद्यार्थी व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## आ. चिखलीकर याच्या हस्ते तालुक्यातील पाच तलाठी सज्जाचे ’दृश्य-श्राव्य प्रणालीद्वारे उद्घाटन

लोहा ।प्रतिनिधी

लोहा तालुक्यातील पाच गावाच्या तलाठी सज्जाचे उदघाटन व्हिडीओ कॉन्फरन्सिंग ( ’दृश्य-श्राव्य प्रणाली) द्वारे आ प्रताप पाटील चिखलीकर यांच्या हस्ते तहसील कार्यालय येथे करणयात आले या गावात जनतेची सोय होणार असून तलाठी यांनी सज्जावर उपस्थिती राहून ग्रामस्थांची कामे करावेत असे प्रतिपादन आ. चिखलीकर यांनी केले आहे

लोहा तालुक्यातील सावरगाव (नसरत.),देऊळगाव (माळ्याचे),धानोरा (मक्ता),रिसनगाव ,दापशेड या पाच गावच्या तलाठी सज्जा कार्यालयाचे उद्घाटन आ.प्रताप पाटील चिखलीकर यांच्या हस्ते दृश्य श्राव्य प्रणाली द्वारे करण्यात आले तहसीलदार विठ्ठल परळीकर युवा नेते प्रवीण पाटील चिखलीकर यांच्या प्रमुख उपस्थितीत हा उद्घाटन सोहळा पार पडला लोकनियुक्त नगराध्यक्ष .शरद पाटील पवार, माजी जि प सदस्य हंसराज पाटील बोरगावकर बाधकाम विभागाचे अभियंता सोमवंशी , माजी.सभापती आनंद पाटील शिंदे

,माजी.उपनगराध्यक्ष दत्ता वाले,माजी उपसभापती रोहित पाटील,गटनेते भास्कर पाटील पवार, बाबाराव पाटील गवते



काबेगावचे सरपंच दुल्लेखा पठाण,रिसनगावचे सरपंच प्रकाश पाटील पवार,दापशेडचे सरपंच वीरभद्र राजरे, भारत पाटील कदम धानोरचे माजी.सरपंच मनोहर पाटील कदम,धानोरचे माजी सरपंच आनंद पाटील कदम,चांद म शेख,खंडू माटोरे,बळीराम माटोरे,इमाम शेख,परमेश्वर भाऊ मुरकुटे,अभंग पाटील गाडेकर,नगरसेवक राजू बोडके,वैजनाथ पाटील पवार,माधव प काकडे आदी उपस्थित होते...

तलाठी यांनी सज्जावर उपस्थित राहावे

लोहा तालुक्यात ज्या नव्याने तलाठी कार्यालय बांधण्यात आले.त्या सज्जा च्या ठिकाणी तलाठी यांनी उपस्थित राहून सर्व सामान्य नागरीकांची कामे करावीत जेणेकरून त्याचा लोह्याला येण्या जाण्याचा वेळ व खर्च वाचेल शिवाय वेळेवर कामे होतील उर्वरित तलाठी सज्जे इमारत बांधण्यात येईल असे आ प्रताप पाटील चिखलीकर यांनी सांगितले

## किनवटमध्ये युवानेते करण येंड्रलवार यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमांनी उत्साहात साजरा

किनवट ।प्रतिनिधी

शिवसेना पक्षाचे युवानेते करण येंड्रलवार यांचा वाढदिवस किनवट शहरात दिवसभर विविध सामाजिक, धार्मिक व जनकल्याणकारी उपक्रमांच्या माध्यमातून उत्साहात साजरा करण्यात आला. अन्नदान, १०१ रक्तदात्यांच्या सहभागातून पार पडलेले रक्तदान शिबिर, इफ्तार पार्टी, मंदिरांमध्ये पूजाअर्चा अशा उपक्रमांमुळे वाढदिवसाला सामाजिक जबाबदारीची वेगळीच छटा लाभली.

वाढदिवसानिमित्त करण येंड्रलवार यांनी श्री अय्यप्पा स्वामी मंदिर, राम मंदिर, विठ्ठलेश्वर मंदिर, नर्मदेश्वर साई मंदिर आदी ठिकाणी जाऊन विधिवत पूजाअर्चा केली. शहराच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना करण्यात आली.

नगरपरिषद परिसरात शिवसेना शहर प्रमुख प्रशांत कोरडे व माजी शहर प्रमुख संतोष येलचलवार यांच्या परिश्रमातून व नियोजनातून आयोजित रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. एकूण १०१ रक्तदात्यांनी स्वयंस्फूर्तीने रक्तदान करून शिबिर यशस्वी केले. या उपक्रमातून वाढदिवसानिमित्त सामाजिक बांधिलकी जपण्याचा संदेश देण्यात आला.

शहरातील विविध भागांत अन्नदानाचे कार्यक्रम राबविण्यात आले. संध्याकाळी रोजा पाळणाऱ्या मुस्लिम बांधवांसाठी इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. सामाजिक ऐक्य व सौहार्दाचे दर्शन या उपक्रमातून घडले.

छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे मनसे जिल्हा पदाधिकारी नितीन मोहरे व समर्थकांनी फटाक्यांची आतषबाजी करत






केक कापून वाढदिवस साजरा केला. शहरातील सरदार नगर, धनराज टाकीज समोर, स.वि.म परिसर आदी भागांत युवकांनी मोठ्या उत्साहात जल्लोष केला. आठवडी बाजारपेठेतील के.टी.एच ग्रुपने ही वाढदिवस मोठ्या थाटामाटात साजरा केला.

मुख्याधिकारी मुगाजी काकडे व कार्यालयीन अधीक्षक अशोक भालेराव यांनी नगर परिषद कर्मचारी तर्फे वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या तर जिल्ह्यातील नेते मंडळी प्रत्यक्ष व दूरध्वनीवरून वाढदिवसाच्या शुभेच्छा देत होते यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते कैलास गोरठेकर पाटील, विधानसभा संपर्कप्रमुख दयाळ गिरी, जिल्हाप्रमुख ज्योतीबा खराटे, माहूरचे नगराध्यक्ष फिरोज दोसानी, युवा सेना जिल्हाप्रमुख यश खराटे, तालुकाप्रमुख मारोती दिवसे पाटील यांच्यासह विविध राजकीय, सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी प्रत्यक्ष भेट देऊन तसेच सोशल मीडियाच्या माध्यमातून शुभेच्छा दिल्या. तर नगरसेवक चंद्रशेखर रंगराव नेम्मानिवार, राजेश जोशी, मुकेश नेम्मानिवार, राजू सातूरवार, साहिल सिरमनवार, मनीष ताडपेल्लीवार, शिवा तिरमनवार, अनिल कोटिलवार, मुन्ना पठाण यांच्यासह मोठ्या संख्येने सहकारी समर्थ उपस्थित होते.

सिद्धार्थ नगर येथे भव्य कार्यक्रम व लाडू तुला प्रभाग क्रमांक ७ च्या नगरसेविका ललिता मारुती मुनेश्वर यांच्या वतीने सिद्धार्थ नगर येथे भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी करण येंड्रलवार यांची लाडू-तुला करण्यात आली. समर्थकांनी पुष्पहार व गोडधोड देऊन अभिष्टचिंतन केले.

दिवसभर किनवट शहरासह तालुका, माहूर तालुका व जिल्ह्यातील विविध भागांतून नागरिक, विविध पक्षांचे पदाधिकारी, शिवसेनेचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने शुभेच्छा देण्यासाठी दाखल झाले. नगरपरिषद किनवट कार्यालयात तसेच त्यांच्या निवासस्थानी भेटीगाठी चा सिलसिला सुरू होता. महिला पदाधिकाऱ्यांची उपस्थितीही लक्षणीय होती.कार्यक्रमाच्या शेवटी बोलताना करण येंड्रलवार म्हणाले, मागील काळात एवढ्या मोठ्या प्रमाणात नागरिकांचे प्रेम मिळणे व माझ्यावर प्रेमाचा वर्षाव होणे यामुळे मी भारावून गेलो आहे. जनतेच्या विश्वासाला पात्र ठरण्यासाठी सामाजिक कार्य अधिक जोमाने सुरू ठेवेन. वाढदिवसानिमित्त पार पडलेल्या विविध सामाजिक उपक्रमांमुळे किनवट शहरात दिवसभर उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.




## अर्धापूरात संत शिरोमणी गुरु रविदास महाराज यांची ६४९ वी जयंती उत्साहात साजरी

अर्धापूर ।प्रतिनिधी

राष्ट्रीय चर्मकार महासंघ तालुका अर्धापूरच्या वतीने संत शिरोमणी गुरु रविदास महाराज यांची ६४९ वी जयंती मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात साजरी करण्यात आली. या निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी १० वाजता मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहणाने करण्यात आली. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून जेष्ठ नेते धर्मराज देशमुख,नगराध्यक्षा सौ. वैशाली प्रवीण देशमुख, राष्ट्रीय चर्मकार संघटनेचे प्रदेशाध्यक्ष माधव गायकवाड, संभाजी वाघमारे, संजय सोनटक्के,के. के. गंगासागरे, जिल्हाध्यक्ष गजानन जोगदंड, जिल्हाध्यक्ष संदीप गोरे,युवा अध्यक्ष रवी गंगासागरे आदी मान्यवर उपस्थिती होते.

संत शिरोमणी गुरु रविदास महाराज यांच्या जीवनावर प्रकाश टाकत, त्यांचे समतेचे आणि मानवतेचे विचार समाजासाठी आजही कसे मार्गदर्शक असल्याचे उपस्थित मान्यवरांची भाषणे झाली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी तालुकाध्यक्ष बालाजी गंगासागरे, उपाध्यक्ष संतोष वाघमारे, गोविंद माऊली पार्डीकर, शिवाजीराव सोनटक्के, तानाजी सोनटक्के, शहराध्यक्ष रवी साखरे, पुंजाजी विनकरे, युवा उपाध्यक्ष संतोष गायकवाड यांनी परिश्रम घेतले. याप्रसंगी कचरू जोगदंड, होनाजी जोगदंड, केशव जोगदंड, गणेश विनकरे, बालाजी सोनटक्के, सुनील पतंगे, रोहिले सर, अरविंद सोनटक्के, मारुती सोनटक्के, केशव सोनटक्के, प्रभाकर साखरे, बाळू शेवाळे, सुनील साखरे, लक्ष्मण साखरे, गजानन साखरे, सचिन गंगासागरे, गजू करोव यांच्यासह चर्मकार समाजातील बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.